RNI No.: MAHBIL/2016/68485
www.acrossstates.com
पोस्टाचा परवाना क्र. MNW/335/2018-20

**भारत दहशतवाद्यांकडे दर्लक्ष करण्याच्या मनस्थितीत नाही**
पान २ पाहा

# मराठी अक्रॉस मुंबई

संपादक- संजय मंगेश भैरे
वर्ष: ९ अंक : १८ ■ मुंबई, मंगळवार २६ मार्च ते ०१ एप्रिल '२४
मूल्य - ५.०० रुपये पाने - ८

**डिजिटल माध्यमांनी माहिती प्रसारणाची गती अन् देवाणघेवाण प्रक्रियाही वाढवली: मनोज पाटील**
पान ३ पाहा

## महायुतीचे 48 पैकी 46 मतदारसंघातील जागा वाटप निश्चित, फक्त 2 जागांमुळे तिढा

■ मुंबई

महायुतीच्या जागा वाटपाचा तिढा जवळपास सुटला असल्याची माहिती आहे. महायुतीच्या 48 पैकी 46 निश्चित झालेत तर 2 जागांवरुन अजूनही तिढा कायम असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. महायुतीमध्ये नाशिक आणि ठाण्याच्या जागेवरुन अजूनही रस्सीखेच सुरु आहे. ठाण्याच्या जागेसाठी भारतीय जनता पक्ष आग्रही आहे. कारण ठाण्यामध्ये भाजपची मोठी ताकद आहे. तर ठाण्याची जागा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रतिष्ठेची असल्याने सेना ही जागा सोडण्यास तयार नाही. ठाणे आणि नाशिक सोडून संभाव्य जागावाटप महायतीचे जागावाटप कसे असेल याचे चित्र स्पष्ट झाले आहे.



**एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेसाठी जागा**

कल्याण
दक्षिण मुंबई
दक्षिण मध्य मुंबई
उत्तर पश्चिम मुंबई
पालघर
मावळ
रामटेक
कोल्हापूर
हातकणंगले
बुलडाणा
शिर्डी
हिंगोली
यवतमाळ वाशिम

**अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या जागा**

बारामती
शिरूर
नाशिक
रायगड
परभणी (महादेव जानकर)

**बाकीच्या जागा भाजप**

**नाशिक आणि ठाण्याच्या जागेवरुन रस्सीखेच**

सध्या ठाण्याचे विद्यमान खासदार राजन विचारे हे आहेत. ते ठाकरे गटात आहेत. या लोकसभा मतदारसंघात भाजपचे 4 आणि शिवसेनेचे 2 आमदार आहेत. शिवाय या मतदारसंघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मतदारसंघ देखील आहे. दुसरीकडे नाशिक जागा तिन्ही पक्ष स्वतः कडे खेचण्याच्या तयारीत आहेत. विद्यमान स्थितीत हेमंत गोडसे हे शिंदे गटाचे खासदार आहेत. मात्र त्याठिकाणी राष्ट्रवादीच्या छगन भुजबळ यांचा दावा यांनी केलाय. शिवाय हेमंत गोडसेंनी काल ठाण्यात शक्ती प्रदर्शन करत नाशिकची जागा खेचून आणण्यासाठी आग्रह धरलाय. काल रात्री नाशिकचे सेनेचे सर्व आमदार, पदाधिकारी आणि स्वतः हेमंत गोडसे हे ठाण्यातील मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाबाहेर ठिय्या मांडून बसले होते.

नाशिकमध्ये कोणाची ताकद किती?

नाशिकच्या जागेवर भारतीय जनता पक्षानेही दावा ठोकलाय. कारण भाजपचे नाशिक लोकसभा मतदारसंघात 3 आमदार आहेत. त्यामुळे भाजप पूर्ण ताकद वापरून ही जागा आपल्याकडे घेण्याच्या प्रयत्नात आहे. नाशिकमध्ये राष्ट्रवादीचे 2 तर काँग्रेसचा 1 आमदार आहे. त्यामुळे संख्याबळ पाहता शिवसेनेची ताकद इथे कमी असल्याने, याच मुद्द्यावरून ही जागा राष्ट्रवादी आणि भाजप स्वतः कडे घेण्याच्या तयारीत आहे. दरम्यान, या जागेसाठी मी गृहमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आग्रह धरणार, असे आश्वासन मुख्यमंत्री शिंदे यांनी हेमंत गोडसे यांना दिले आहे.

## महाराष्ट्रात भाजपाचे 23 उमेदवार जाहीर

### पाच विद्यमान खासदारांचा पत्ता कट



■ मुंबई

महाराष्ट्रात १९ एप्रिल ते २० मे अशी पाच टप्प्यांमध्ये लोकसभा निवडणूक होणार आहे. भाजपाने देशपातळीवर पाच याद्या जाहीर केल्या आहेत. त्यातली दुसरी यादी आणि पाचवी यादी यामध्ये महाराष्ट्रातले २३ उमेदवार जाहीर झाले आहेत. भाजपाने २०१९ मध्ये २३ जागा जिंकल्या होत्या. त्यानुसार भाजपाने २३ उमेदवार जाहीर केले आहेत. पूनम महाजन यांची जागा वगळता भाजपाने २३ उमेदवारांना लोकसभेचं तिकिट दिलं आहे. यामध्ये पंकजा मुंडे, सुधीर मुनगंटीवार यांनाही स्थान देण्यात आलं आहे. तर पाच विद्यमान खासदारांचा पत्ता भाजपाने कापला आहे. आपण जाणून घेऊ भाजपाने किती जणांना कुठून उमेदवारी दिली आहे?

**पाच विद्यमान खासदारांचा पत्ता कट**

भाजपाने आत्तापर्यंत जी २३ नावं जाहीर केली आहेत त्यानुसार पाच विद्यमान खासदारांची तिकिटं कापण्यात आली आहे. उत्तर मुंबईचे खासदार गोपाळ शेट्टी, बीडच्या खासदार प्रीतम मुंडे, मुंबई उत्तर पूर्वचे खासदार मनोज कोटक, जळगावचे विद्यमान खासदार उन्मेष पाटील यांना भाजपाने तिकिट दिलेलं नाही. तर सोलापुरात जयसिद्धेश्वर स्वामी हे भाजपाचे खासदार आहेत. त्यांच्याऐवजी राम सातपुतेंना तिकिट देण्यात आलं आहे.

**विद्यमान खासदारांच्या जागांवर कुणाची वर्णी?**

गोपाळ शेट्टींऐवजी पियूष गोयल यांना उत्तर मुंबई मतदारसंघातून लोकसभेचं तिकिट

मनोज कोटक यांच्याऐवजी मिहिर कोटेचांना मुंबई उत्तर पूर्व मधून लोकसभेचं तिकिट

बीड लोकसभा मतदारसंघातून प्रीतम मुंडेंच्या ऐवजी पंकजा मुंडे लोकसभेच्या मैदानात

जळगावमधून उन्मेष पाटील यांच्याजागी स्मिता वाघ यांना तिकिट

सोलापूरमधून जयसिद्धेश्वर स्वामींच्या ऐवजी राम सातपुते यांना तिकिट.

**आत्तापर्यंत भाजपाचे जाहीर झालेले २३ उमेदवार कोण?**

१) चंद्रपूर- सुधीर मुनगंटीवार
२) रावेर – रक्षा खडसे
३) जालना- रावसाहेब दानवे
४) बीड – पंकजा मुंडे
५) पुणे- मुरलीधर मोहोळ
६) सांगली – संजयकाका पाटील
७) माढा- रणजीत निंबाळकर
८) धुळे – सुभाष भामरे
९) उत्तर मुंबई- पियुष गोयल
१०) उत्तर पूर्व मुंबई- मिहीर कोटेचा
११) नांदेड- प्रतापराव चिखलीकर
१२) अहमदनगर- सुजय विखे पाटील
१३) लातूर- सुधाकर श्रृंगारे
१४) जळगाव- स्मिता वाघ
१५) दिंडोरी- भारती पवार
१६) भिवंडी- कपिल पाटील
१७) वर्धा – रामदास तडस
१८) नागपूर- नितीन गडकरी<br>१९) अकोला- अनुप धोत्रे
२०) नंदुरबार- डॉ. हिना गावित
२१) सोलापूर – राम सातपुते
२२) भंडारा गोंदिया – सुनील मेंढे
23) गडचिरोली चिमूर – अशोक नेते

भाजपाने लोकसभेसाठी २३ नावांची यादी आत्तापर्यंत जाहीर केली आहे. महायुतीचा जागावाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. आता शिवसेना आणि राष्ट्रवादी यांना प्रत्येकी किती जागा मिळणार? हे स्पष्ट झालेलं नाही. दुसरीकडे महाविकास आघाडीत काँग्रेसने १२ जणांची यादी जाहीर केली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची यादी मंगळवारी जाहीर केली जाईल असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे. त्यामुळे कुणाला कुठून उमेदवारी दिली जाणार? हे पाहणं रंजक असणार आहे.

## देशभरात होळीचा उत्साह:अयोध्या-मथुरा ते अमेरिकेपर्यंत रंगांची उधळण

■ नवी दिल्ली

देशभरात होळी साजरी करण्यात आली. वाराणसी आणि मथुरा-वृंदावनमधील रस्ते रंगात भिजलेल्या लोकांनी भरलेले आहेत. उज्जैन येथील महाकाल मंदिरात संध्याकाळी होलिका दहनाने होळीला सुरुवात झाली. मात्र, भाद्र असल्याने बहुतांश ठिकाणी होलिका दहन रात्री 11 नंतरच करण्यात आले.

येथे, अयोध्येच्या राम मंदिरात विराजमान झालेल्या बाल रामांची पहिली होळी आहे. येथे कचनारच्या फुलांपासून खास गुलाल तयार करण्यात आला आहे. कचोरी, गुजिया, खीर, पुरीसह अनेक पदार्थ रामलल्लाला अर्पण केले जातील.

राजस्थानात भारतीय आणि परदेशी एकत्र होळी खेळले. इथे रस्त्यावर लोक चंगच्या तालावर फागच्या गाण्यावर नाचत आहेत. पुष्कर (अजमेर) येथे विदेशी पर्यटक रंग खेळत आहेत. डुंगरपूरमध्ये 100 वर्षांच्या परंपरेचा एक भाग म्हणून, लहान मुले, तरुण आणि ज्येष्ठांनी रंग, गुलाल आणि ढोल कुंडीसह होळी खेळली.

मध्य प्रदेशात होळीचा सण मोठ्या थाटामाटात साजरा केला जात आहे. उज्जैनमधील महाकाल मंदिरात भस्मार्तीदरम्यान भक्तांनी बाबा महाकालसोबत होळी खेळली. भोपाळमध्ये मोबाईल फंक्शन असेल, ज्यामध्ये ट्रकमधून रंग उडवले जातील. यामध्ये संपूर्ण शहराचा सहभाग असेल.

यूपीमध्ये मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी गोरखनाथ मंदिरात रुद्र अभिषेक केला. वाराणसीच्या अस्सी घाटावर लोक पीएम मोदींच्या मुखवटामध्ये होळी खेळताना दिसले. मथुरेत रस्त्यांपासून मंदिरांपर्यंत रंग उडत आहेत. होळी खेळण्यासाठी परदेशातून लोक आले आहेत.

बिहारमध्ये मंगळवारी 26 मार्चला होळी साजरी केली जाणार आहे. फाल्गुन शुक्ल पौर्णिमा दोन दिवसांवर असल्याने अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. 24 रोजी होलिका दहनानंतर 26 तारखेला होळी साजरी केली जाणार आहे.



## महाकालच्या गर्भगृहात आग, पुजाऱ्यासह 14 जण होरपळले

■ उज्जैन

उज्जैन येथील महाकालेश्वर मंदिरात सोमवारी पहाटे 5.49 वाजता भस्म आरतीच्या वेळी गर्भगृहात आग लागली. यामध्ये पुजाऱ्यासह 14 जण भाजले. जखमींपैकी 9 जणांना इंदूरला रेफर करण्यात आले आहे. उज्जैन जिल्हा रुग्णालयातून 3 जणांना डिस्चार्ज देण्यात आला, 2 दाखल आहेत.

अपघात झाला त्यावेळी मंदिरात हजारो भाविक महाकालसोबत होळी साजरी करत होते. मागून आरती करत असलेल्या पुजारी संजीव यांच्यावर कोणीतरी गुलाल उधळल्याचे जखमी सेवकाने सांगितले. गुलाल दिव्यावर पडला. गुलालात काही रसायन असल्याने आग लागल्याचा अंदाज आहे.

गर्भगृहातील चांदीच्या आवरणाला रंगापासून वाचवण्यासाठी फ्लॅक्स लावली जात असे. यामुळेही आग लागली. काही लोकांनी अग्निशमन यंत्राच्या साह्याने आग आटोक्यात आणली. असाच प्रकार सहा वर्षांपूर्वी महाकाल मंदिरात होळीच्या दिवशी घडला होता. तेव्हा एक पुजारी भाजला होता.

उज्जैनचे जिल्हाधिकारी नीरज सिंह यांनी सांगितले की, या घटनेच्या दंडाधिकारी चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीला तीन दिवसांत अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे. तपासात जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## चांद्रयान-3 लँडिंग साइटला आता अधिकृतपणे 'शिवशक्ती पॉइंट' म्हटले जाईल:इंटरनॅशनल ॲस्ट्रॉनॉमिकल युनियनने दिली मान्यता

■ नवी दिल्ली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 26 ऑगस्ट 2023 रोजी चांद्रयान-3 च्या लँडिंग साइटला 'शिवशक्ती' पॉइंट म्हटले जाईल, असे सांगितले होते. त्यांच्या घोषणेनंतर सुमारे सात महिन्यांनी या नावाला आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्रीय संघ (IAU) ने 19 मार्च रोजी मान्यता दिली.



चांद्रयान-3 चे प्रक्षेपण 14 जुलै रोजी श्रीहरिकोटा येथून करण्यात आले. विक्रम लँडर 23 ऑगस्ट रोजी संध्याकाळी 6.04 वाजता चंद्रावर उतरला. तीन दिवसांनंतर, पीएम मोदी वैज्ञानिकांना भेटण्यासाठी इस्रो टेलिमेट्री ट्रॅकिंग आणि कमांड नेटवर्कवर पोहोचले.

चांद्रयान-3 मिशनचे तीन भाग होते. प्रोपल्शन मॉड्यूल, लँडर आणि रोव्हर. त्यांच्यावर एकूण 7 पेलोड बसविण्यात आले. चांद्रयान-3 च्या प्रोपल्शन मॉड्यूलवर SHAPE नावाचा पेलोड बसवण्यात आला होता. चंद्राच्या कक्षेत फिरून पृथ्वीवरून येणाऱ्या किरणोत्सर्गाचा तपास करण्यासाठी ते तयार करण्यात आले होते.

लँडरवर तीन पेलोड होते. रंभा, चास्टे आणि इल्सा. प्रग्यानवर दोन पेलोड होते. अमेरिकन स्पेस एजन्सी नासाकडे लेझर रेट्रोरिफ्लेक्टर नावाचे उपकरण देखील आहे. हे चांद्रयान-3 च्या लँडरवर बसवण्यात आले आहे. याचा उपयोग चंद्रापासून पृथ्वीचे अंतर मोजण्यासाठी केला जातो.

## रंगपंचमीच्या दिवशी पतीने पत्नीसह 2 मुलींना जिंवत जाळलं

■ अहमदनगर

देशभरात रंगपंचमीचा सण उत्साहात साजरा होत असताना अहमदनगर जिल्ह्यात एक हादरवणारी घटना घडली आहे. एका व्यक्तीने आपली पत्नी आणि दोन मुलींना जिंवत जाळलं. या तिघांचाही मृत्यू झाला. नगर तालुक्यातील पिंपळगाव लांडगा इथली ही धक्कादायक घटना आहे. लीलाबाई सुनील लांडगे, साक्षी आणि खुशी अशी मृतांची नावं आहेत. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. नगर पोलिसांनी आरोपी सुनील गोरख लांडगे याला ताब्यात घेतलं आहे. हत्येमागचं कारण अद्याप अस्पष्ट आहे.

पत्नी आणि दोन मुलींना जाळून मारल्याची घटना अहमदनगर जिल्ह्यात घडली आहे. चारित्र्याच्या संशयावरून पतीने केलेल्या या कृत्यामुळे नगरसह परिसरामध्ये खळबळ उडाली आहे. नगर शहरा जवळ असलेल्या पिंपळगाव लांडगा इथं राहाणाऱ्या आरोपी सुनील लांडगे याने आपली पत्नी लीला आणि दोन मुलींना घरात कोंडलं बाहेरून कुलूप लावेल आणि घरामध्ये पेट्रोल टाकून आग लावली. यात पत्नी आणि दोन मुलींचा जाळून जागीच मृत्यू झाला. हा सर्व प्रकार सुनील याने पत्नीच्या अनैतिक संबंधाच्या संशयावरून केल्याची माहिती समोर आली आहे. आग लागल्याची माहिती मिळताच ग्रामस्थ आग विझवण्यासाठी सुनील याच्या घराकडे धावले. मात्र आग लागलेल्या घराला कुलूप असल्यामुळे त्यांना काही मदत करता आली नाही. दरम्यान नगर तालुका पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी आरोपी सुनील लांडगे याला ताब्यात घेतलं. मद्यधुंद अवस्थेत असलेल्या सुनील याने पोलिसांना केलेल्या कृत्याची कबुली दिली आहे. पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत

## नाराजी असेल तरी युतीचे नुकसान करणाऱ्या 'नोटा'चा वापर मुळीच नको !

### भाजप कार्यकर्त्यांना सरसंघचालकांनी बजावले

सुनील ओसवाल
■ मुंबई



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा (आरएसएस ) आदेश डावलून भाजपच्या कार्यकत्यांनी आगामी लोकसभेसाठी 'नोटा'चा अधिकार वापरण्याची मोहीम सुरू केली असल्याने संघात नाराजी असल्याचे सांगण्यात येते. या मुळे यांचा फटका लोकसभा निवडणुकीत बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भाजपने सत्ताकारणासाठी राष्ट्रवादी अजित पवार गटाला सोबत घेतले. त्यामुळे अनेक मतदारसंघांत भाजप समर्थकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. त्यातील काही जणांनी लोकसभेला 'नोटा'चा वापर करण्याचा विचार व्यक्त केला. त्याची गंभीर दखल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनीही घेतली. गेल्या वर्षीच्या मेळाव्यात त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला. 'जे उमेदवार उपलब्ध आहेत. त्यातील सर्वोत्तम निवडा' ,'नोटा' सारखा महायुतीचे नुकसान करणारा मार्ग नकोच असा आदेश सरसंघचालकांनी दिला आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांचा आदेश डावलून भाजपा लोकसभा निवडणूक लढविणार कशी असा सवाल केला जात आहे. राज्यातील सत्ता ताब्यत घेण्यासाठी भाजपाने पक्षाची भूमिका आणि विचार याचा कोणताही विचार न करता अजित पवारांना सोबत घेतल्याने राज्यात अनेक मतदार संघात नाराजी असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे परिनामी उघड नाराजी व्यक्त करण्याऐवजी नोटोचा वापर करण्याचा निर्णय घेतला पण याला भाजपने विरोध केल्याने संघात नाराजी असल्याचे सांगण्यात येते.

**सर्वोत्तम उमेदवार निवडा,'नोटा'चा विचार नको !**

*राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनीही गेल्या वर्षीच्या मेळाव्यात त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. 'जे उमेदवार उपलब्ध आहेत. त्यातील सर्वोत्तम निवडा' असा आदेश त्यांनी दिला. या आदेशाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. पण त्याकडे बुलडाण्यात दुर्लक्ष होत असल्याचे दिसत आहे. बुलडाणा लोकसभा मतदारसंघात भाजपचे तीन आमदार असून शिंदेसेनेचे खासदार याच पाठबळावर निवडणूक जिंकतात. त्यामुळे यावेळी भाजपला जागा सोडण्यात यावी, अन्यथा 'नोटा' चे बटण दाबू असा मेसेज भाजपसहित इतर ग्रुपवर आठ दिवसांपूर्वी व्हायरल झाला. त्यामुळे खळबळ उडाली आहे.*

## काँग्रेसच्या महिला नेत्याने पोस्ट केलेल्या कंगनाच्या 'त्या' फोटोवरुन वादंग

■ नवी दिल्ली

बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री कंगना रणौतला हिमाचल प्रदेशमधील मंडी लोकसभा मतदारसंघातून भाजपाने उमेदवारी जाहीर केली आहे. यावरून विरोधकांनी कंगना आणि भाजपावर निशाणा साधला आहे. तर, काँग्रेसच्या महिला नेत्या सुप्रिया श्रीनेत यांच्या फेसबूक आणि इन्स्टा खात्यावरून कंगनाचा एक अश्लिल फोटो पोस्ट झाला होता. या फोटोवरून आता सोशल मीडियावर रान उठलं असून भाजपा आणि काँग्रेस यांच्यात जुंपली आहे.

हिमाचल प्रदेशमधील मंडी लोकसभा मतदारसंघातून कंगना रणौतला उमेदवारी जाहीर झाली आहे. ही उमेदवारी जाहीर होताच काँग्रेसच्या महिला नेत्या सुप्रिया श्रीनेत यांनी कंगना राणौत यांचा एक अर्धनग्न फोटो पोस्ट करून त्यांच्यावर अश्लिल टिप्पणी केली होती. एका महिला नेत्यानेच महिला उमेदवारावर अश्लिल टीका केल्याने भाजपाने संताप व्यक्त केला. तर, कंगना रणौत यांनीही सुप्रिया यांच्यावर पलटवार केला.



कंगना राणौत काय म्हणाली?

कलाकार म्हणून माझ्या गेल्या २० वर्षांच्या कारकिर्दीत मी सर्व प्रकारच्या महिलांच्या भूमिका केल्या आहेत. राणीमधील एका भोळ्या मुलीपासून ते धाकडमधील मोहक गुप्तहेरपर्यंत, मणिकर्णिकामधील देवीपासून चंद्रमुखीतील राक्षसापर्यंत, रज्जोमधील वेश्येपासून थलाईवीतील क्रांतिकारक नेत्यापर्यंत. आपण आपल्या मुलींना पूर्वग्रहांच्या बंधनातून मुक्त केले पाहिजे. तसंच, वेश्याव्यवसाय करणाऱ्या कामगारांचा अशाप्रकारे अपमान करणे थांबवले पाहिजे. प्रत्येक स्त्री तिच्या सन्मानास पात्र आहे, असा पलटवार कंगनाने केला.

सुप्रिया श्रीनेत यांचं स्पष्टीकरण

माझ्या फेसबूक आणि इन्स्टाग्राम खात्याचा गैरवापर करून एका व्यक्तीने अत्यंत घृणास्पद आणि आक्षेपार्ह पोस्ट केली आहे. ही पोस्ट आता काढून टाकण्यात आली आहे. मला ओळखण्याऱ्यांना माहित असेल की मी स्त्रियांबाबत असं कधीच करणार नाही. माझ्या नावाचा गैरवापर करणारे पॅरोडी खातेही सुरू असून यातून संपूर्णपणे गैरप्रकार सुरू आहे. या खात्याची तक्रार केली आहे.

दरम्यान,हा फोटो कोणी पोस्ट केला? याची चौकशी सुरू असल्याचंही सुप्रिया श्रीनेत यांनी सांगितलं आहे. परंतु, या फोटोवरून आता भाजपा आणि काँग्रेस यांच्यात वाद पेटण्याची शक्यता आहे.

## थोडक्यात

### वडाळा येथील टॉवरमध्ये आग; तीन फ्लॅट जळून खाक

**मुंबई:** वडाळा येथे दोस्ती अँब्रोसिया या तळापासून ४० मजली इमारतीतील २६ व्या मजल्यावर एका फ्लॅटमध्ये भीषण आग लागल्याची घटना शुक्रवारी रात्री उशिराने घडली. हळूहळू ही आग पसरली व त्यामध्ये तीन फ्लॅट व त्यातील किमती सामान जळून खाक झाले. तसेच, आग लागल्याने इमारतीमधील भयभीत झालेल्या रहिवाशांना जीव वाचविण्यासाठी लिफ्ट ऐवजी जिन्याद्वारे पायऱ्या उतरून इमारतीबाहेर धाव घ्यावी लागली आणि स्वतःचा व कुटुंबीयांचा जीव वाचवावा लागला. व ते थोडक्यात बचावले.दरम्यान, अग्निशमन दलाने रात्री १.१० वाजता आगीवर नियंत्रण मिळवून आग विझविली. सुदैवाने या आगीत कोणी जखमी झाले नाही. मात्र इमारतीमध्ये आग लागल्याने इमारतीचा विद्युत पुरवठा रात्रीच खंडित करण्यात आला. त्यामुळे काही रहिवाशांनी आपल्या नातेवाईकांकडे तर काही लोकांनी जादा भाडे देत जवळच्या हॉटेलमध्ये राहणे पसंत केल्याचे समजते. रात्री उशिराने आग विझविण्यात आली व त्यानंतर वीज पुरवठा सुरळीत झाल्यानंतर काही रहिवाशी पुन्हा घरी परतले.

### राज्यातून आचारसंहिता काळात 23 कोटींची रोकड जप्त

**मुंबई:** लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून आतापर्यंत राज्यात 23 कोटी रुपयांची बेहिशेबी रोकड, तर १७ लाख लिटर दारु जप्त करण्यात आली आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम्यांनी आज दिली. आचारसंहितेच्या काळात परवानाधारकांची शस्त्रे ताब्यात घेण्यात येतात, मात्र आतापर्यंत ३३ हजारांहून अधिक परवानाधारकांनी त्यांच्याकडील रिव्हॉल्वर, बंदुका सरकारकडे जमा केलेल्या नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. राज्यात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून जप्त करण्यात आलेल्या बेहिशेबी २३ कोटी रुपयांपैकी सर्वाधिक म्हणजे ३ कोटी ५० लाख रुपयांची रोकड मुंबईच्या उपनगरातून जप्त करण्यात आली आहे. याशिवाय ४३ किलो सोने, चांदी आणि इतर मौल्यवान ऐवजही जप्त करण्यात आला आहे. राज्यात आचारसंहिता लागू झाल्यापासून सीआरपीसी प्रमाणे १३ हजार १४१ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली.

# विरार-बोळींजमधील घरांच्या विक्रीसाठी वित्तीय संस्थेची नियुक्ती

## कोकण मंडळाच्या रिक्त 5194 घरांच्या विक्रीसाठी विविध पर्यायांचा अवलंब




प्रतिनिधी
मुंबई

म्हाडाच्या कोकण मंडळाच्या विरार-बोळींजमधील रिक्त ५१९४ घरांची विक्री करण्याकरिता मंडळाने आता विविध पर्यायांचा अवलंब करण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार आता या घरांच्या विक्रीसाठी वित्तीय संस्थेची नियुक्ती करून त्यांच्या माध्यमातून घरे विकण्यात येणार आहेत. यासाठी निविदा प्रसिद्ध करून इच्छुक वित्तीय संस्थांकडून विनंती प्रस्ताव मागविण्यात आले आहे.

ही निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यास वित्तीय संस्थेची नियुक्ती करून संबंधित वित्तीय संस्थेच्या माध्यमातून घरांची विक्री केली जाणार आहे. या पर्यायाअंतर्गत लाभार्थ्यांना सुरुवातीला घराच्या विक्री किंमतीच्या २५ टक्के रक्कम भरून घराचा ताबा घेता येणार आहे. तर उर्वरित ७५ टक्के रक्कम पुढील १० वर्षांत भरता येणार आहे. मात्र यासाठी ८.५० टक्के व्याज आकारण्यात येणार आहे.

विरार-बोळींज गृहप्रकल्पातील ५१९४ घरे रिक्त आहेत. अंदाजे दीड हजार कोटी रुपये किंमतीच्या या घरांची विक्री करण्यासाठी म्हाडा प्राधिकरणाने नवीन धोरण आखले आहेत. या धोरणातील पाचपैकी दोन पर्यायांचा स्वीकार आता कोकण मंडळाने रिक्त घरांच्या विक्रीसाठी केला आहे. पहिला पर्याय म्हणजे व्यक्ती, संस्थेला एका वेळी १०० घरे विकत घेण्याची मुभा देण्यात आली असून यासाठी सदनिकेच्या विक्री किंमतीवर १५ टक्के सवलतही देण्यात आली आहे. या पर्यायाअंतर्गत घरांची विक्री करण्याकरिता निविदेद्वारे मंडळाने विनंती प्रस्ताव मागविले आहेत. आता दुसरीकडे वित्तीय संस्थेच्या माध्यमातून घरांची विक्री करण्यासाठीही निविदा प्रसिद्ध करून विनंती प्रस्ताव मागविण्यात आल्याची माहिती मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

इच्छुक वित्तीय संस्थांकडून १६ मार्चपासून विनंती प्रस्ताव सादर करण्यास सुरुवात झाली असून विनंती प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत १९ एप्रिल आहे. तर २६ मार्चला निविदा पूर्व बैठक होणार असून यावेळी किती वित्तीय संस्था यासाठी इच्छुक आहेत याचा अंदाज मंडळाला येणार आहे. तर २६ एप्रिलला निविदा खुल्या केल्या जाणार आहे.

**नव्या पर्यायांमुळे घर विक्रीला वेग मिळणार**

*रिक्त घरांच्या विक्री धोरणातील या पर्यायानुसार वित्तीय संस्थेची नियुक्ती झाल्यास या वित्तीय संस्थेवर घरांच्या विक्रीची जबाबदारी असणार आहे. या वित्तीय संस्थेला यासाठी प्रत्येक घरामागे विक्री किंमतीच्या ५ टक्के आर्थिक मोबदला दिला जाईल. त्याचवेळी ग्राहकांना या घरांकडे आकर्षित करण्यासाठी त्यांना २५ टक्के रक्कम भरून घराचा ताबा दिला जाणार आहे. तर उर्वरित ७५ टक्के रक्कम पुढील दहा वर्षांत समान मासिक हप्त्याच्या रुपात भरण्याची मुभा दिली जाणार आहे. एकूणच ग्राहकांना गृहकर्ज घेण्याची गरज भासेल. असे असले तरी ७५ टक्के रक्कमेवर ८.५० टक्के व्याज आकारणी केली जाणार आहे. मात्र रक्कम भरणे सुलभ होणार असल्याने, एकाच वेळी रकमेचा भार पडणार नसल्याने या पर्यायाला चांगला प्रतिसाद मिळेल.*

# नियोजित मुंबई सेंट्रल पार्क आणि मुंबई किनारी रस्ता प्रकल्प प्रगतीची आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडून पाहणी



प्रतिनिधी
मुंबई

मुंबई महानगरपालिकेचे नवनियुक्त आयुक्त भूषण गगराणी यांनी काल शनिवारी सुट्टीच्या दिवशी महानगरपालिकेच्या वतीने साकार होणाऱ्या नियोजित मुंबई सेंट्रल पार्क संदर्भात महालक्ष्मी रेसकोर्स येथे प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. तसेच त्यांनी मुंबई किनारी रस्ता प्रकल्पाच्या कामाचीदेखील त्यांनी पाहणी केली.

मुंबईतील महालक्ष्मी रेस कोर्सची एकूण २११ एकर जागा मे. रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लिमिटेड यांना भाडेपट्ट्यावर दिलेली होती. त्याची मुदत संपल्यानंतर या २११ एकर जागेपैकी १२० एकर जागा शासनाच्या माध्यमातून अलीकडेच महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यास मान्यता दिली. तर उर्वरित ९१ एकर जागा मे. रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लिमिटेड यांना भाडेपट्ट्याने देण्यात येणार आहे.

रेसकोर्सच्या भूखंडापैकी महानगरपालिकेला सुपूर्द केलेल्या १२० एकर जागेवर तसेच रेसकोर्स परिसरामध्ये लागून असलेल्या मुंबई किनारी रस्ता प्रकल्पामध्ये १७० एकर असे दोन्ही मिळून एकूण ३०० एकर जागेवर सार्वजनिक उद्यान (थीम पार्क) विकसित करण्यात येणार आहे. मुंबई सेंट्रल पार्क या नावाने ओळखण्यात येणाऱ्या या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रकल्पाच्या प्रस्तावित आराखड्याची व त्यानुसार प्रत्यक्ष स्थळावरील स्थिती जाणून घेण्यासाठी आयुक्त भूषण गगराणी यांनी ही पाहणी केली.

या वेळी अतिरिक्त पालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, उपायुक्त (वित्त) प्रशांत गायकवाड, सहायक आयुक्त (मालमत्ता) विनायक विसपुते, सहायक आयुक्त (जी दक्षिण) संतोष धोंडे, प्रमुख अभियंता (मुंबई किनारी रस्ता प्रकल्प) गिरीश निकम आणि संबंधित अधिकारी तसेच मे. रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लिमिटेड चे सचिव निरंजन सिंग आदी उपस्थित होते.

महालक्ष्मी रेस कोर्सचे प्रवेशद्वार, गवती धावपट्टी (ग्रास ट्रॅक), वाळूची धावपट्टी (सँड ट्रॅक), घोड्यांच्या तबेल्यांचे ठिकाण, पोलो मैदान तसेच प्रेक्षकगृह (गॅलरी) आदी सर्व ठिकाणी भेटी देवून सध्या सुरु असलेला वापर आणि नियोजित आराखड्यानुसार केली जाणारी कार्यवाही यांची सविस्तर माहिती आयुक्त गगराणी यांनी जाणून घेतली. रेसकोर्सवरील सार्वजनिक उद्यान आणि पलीकडील मुंबई किनारी रस्ता प्रकल्पातील उद्यान यांना जोडण्यासाठी भूयारी मार्ग, नागरिकांच्या तसेच वाहनांच्या येण्या-जाण्याची व्यवस्था, पार्कच्या निर्मितीनंतर रेसकोर्स व सार्वजनिक उद्यान यांची सुरळीत देखभाल यादृष्टिने आवश्यक बारीकसारीक सर्व तपशिलांची माहिती उपआयुक्त (वित्त) प्रशांत गायकवाड यांनी दिली. त्यानंतर या सार्वजनिक उद्यानाच्या कार्यवाहीला वेग देण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी सर्व संबंधित विभागांना दिले.

# अनिता दाभोळकर यांचा महिला व बाल विभागतर्फे सन्मान

प्रतिनिधी
मुंबई

महिला बाल विकास सेवा योजना मुंबई उपनगर अंतर्गत अंधेरी पूर्व प्रकल्पातील साईवाडी विभागात सन 2023-2024 या वर्षात अंगणवाडी कार्य क्षेत्रात पोषण अभियान, बेटी बचाओ, बेटी पढाओ एकात्मिक सेवा योजना अंतर्गत उल्लेखनीय कामकाजाबद्दल अनिता अनंत दाभोळकर यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



अनिता दाभोळकर यांनी गेली 40 वर्षे अंगणवाडी क्र. 10 साईवाडी अंधेरी विभागात साईनगर लोकसेवा समिती , (रजिस्टर )कार्यालयात प्रामाणिकपणे काम करीत आहेत. त्याबद्दल अंगणवाडी सेविका, व मदतनीस तसेच अनेकांनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# वै. हभप विठोबा आण्णा मालुसरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त स्मृती सन्मान पुरस्कार

प्रतिनिधी
मुंबई

स्वातंत्र्यसेनानी आणि तत्कालीन कुलाबा जिल्हा कृषी सभापती वै हभप विठोबाआण्णा सुभनराव मालुसरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मंगळवार दिनांक 26 मार्च 2024 रोजी पोलादपूर तालुका साखर खडकवाडी येथे वसा समजासेवेचा सन्मान कर्तृत्वाचा या आधारे समाजात कार्यरत असणाऱ्या मुंबईसह तालुक्यातील पाच निवडक सामाजिक कार्यकर्त्यांचा वै. हभप विठोबाआण्णा मालुसरे स्मृती सन्मान पुरस्काराने गौरव करण्यात येणार असल्याचे मालुसरे बंधू ऐक्यवर्धक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील वारकरी परंपरा तसेच कीर्तन , प्रवचनाचा वारसा पुढे अखंड चालू रहावा आणि समाजाला प्रबोधन व्हावे यासाठी वै.हभप विठोबाआण्णा मालुसरे यांनी तालुक्यातील प्रत्येक गावात आणि वाडीवस्तीवरील कीर्तन सोहळ्यात हजेरी लावून कार्यक्रमाना उत्तेजीत केले होते. जन्मशताब्दी ची सुरुवात करताना तालुक्यातील गायनाचार्य, मृदुंगाचार्य यांच्या उपस्थितीत भव्य सुस्वर भजनाचा कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला आहे.



त्याचप्रमाणे जन्मशताब्दी वर्षाचे निमित्त साधून मुंबई आणि तालुक्यातील सामाजिक कार्य पाच निवडक कार्यकर्त्यांचा पुरस्कार प्रदान करून होणार आहे. कृष्णा कदम ( के के ) - ओंबली, सुभाष जाधव - खडकवाडी , गोविंद चोरगे- साखर , महेश मालुसरे - मुळशी पुणे , निलेश कोळसकर- देवळे यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याचे मालुसरे बंधू ऐक्यवर्धक मंडळाच्या वतीने सांगितले आहे.

# प्रत्येक मतदाराने मतदानाचा हक्क बजावण्याचे निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांचे आवाहन

प्रतिनिधी
मुंबई

मुंबई उपनगर जिल्हा अंतर्गत जुहू परिसरात मतदार जागृती कार्यक्रम घेण्यात आला. मतदान प्रक्रिया हा लोकशाहीचा उत्सव असून प्रत्येक मतदाराने आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी केले आहे. मुंबई उपनगर जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई उपनगरमध्ये मतदार जागृती मोहीम सुरू आहे. त्याचाच भाग म्हणून उपनगरातील विविध विभागात प्रतिज्ञा घेण्याचा उपक्रम राबविण्यात आला.



यावेळी मुंबई महानगर पालिका विशेष कार्य अधिकारी तथा मुंबई स्वीप' अभियानाचे समन्वय अधिकारी डॉ सुभाष दळवी यांच्या उपस्थितीमध्ये सहाय्यक अभियंता तथा 'स्वीप'चे सहाय्यक नोडल अधिकारी सुनील पानसकर यांनी 'माझा संकल्प द्वारे' मतदानाबाबत शपथ दिली. यावेळी संबंधित विभागातील अधिकारी उपस्थित होते.

**मतदार नोंदणीबाबत आवाहन**

*के/पश्चिम विभागात पुष्पा नरसी पार्क, व्ही. एम. रोड व एन. एस. रोड नंबर १० आणि परिसरातील जोड रस्ते या ठिकाणी मतदार जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी घन कचरा व्यवस्थापन करणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कामगारांसमवेतच परिसरातील नागरिकांनाही नवीन मतदार नोंदणी, मतदान ओळखपत्रातील नाव बदलणे अथवा रहात असलेल्या ठिकाणांचा पत्ता बदलणे याबाबत 'स्वीप' अभियानाचे समन्वय अधिकारी डॉ सुभाष दळवी यांनी मार्गदर्शन केले. डॉ. दळवी यांनी नव मतदार नोंदणी आणि मतदार यादीतील नावात बदल ऑनलाइन करण्यासंदर्भातील प्रात्यक्षिक दाखवले आणि अधिकाअधिक मतदारांनी या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले.*

# बेस्ट कला,क्रीडा मंडळातर्फे विनोदी विडंबन गीतांचा कार्यक्रम

## कविवर्य म.पा.भावे यांना जन्मशताब्दी वर्षानिमित्त मानवंदना

प्रतिनिधी
मुंबई

जागतिक काव्य दिनाचे औचित्य साधून बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाच्या, संगीत व साहित्य विभागाच्या वतीने "स्वप्नातल्या कळ्यांनो, उमलू नकाच केंव्हा" ह्या अजरामर गीताचे गीतकार, बेस्ट उपक्रमाचे माजी कर्मचारी सुप्रसिद्ध कविवर्य "म.पा.भावे" यांच्या जन्मशताब्दी वर्षा निमित्त, त्यांना मानवंदना देण्याकरिता त्यांनीच लिहिलेल्या आणि त्यांचे चिरंजीव विकास भावे यांनी दिग्दर्शित केलेल्या विनोदी विडंबन गीतांचा संगीतमय कार्यक्रम "अरे संसार संसार" या कार्यक्रमाचे आयोजन, रमेश रणदिवे कलादालन (मिनी थिएटर) आणिक आगार येथे केले होते,




या कार्यक्रमाला 'कुटुंब रंगलंयकार' प्राध्यापक विसूभाऊ बापट उपस्थित होते, सदर प्रसंगी बापट यांनी म.पा.भावे यांनी लिहिलेली एक कविता सादर केली,या कार्यक्रमाला बेस्ट समितीचे माजी अध्यक्ष अनिल कोकीळ साहेब, जे.जे.स्कूल ऑफ आर्ट विद्यापीठाचे कुलगुरु विश्वनाथ साबळे, बेस्ट कला आणि क्रीडा मंडळाचे सभापती (कला) डॉ.राजेंद्र पाटसुते, सभापती (क्रीडा) धनंजय पवार, सरचिटणीस कला विजय सूर्यवंशी, उप सरचिटणीस कला संगिता पुरव इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचा रसिक प्रेक्षकांनी मनमुराद आनंद घेतला.

# भारत दहशतवाद्यांकडे दुर्लक्ष करण्याच्या मनस्थितीत नाही

## पाक उद्योग पातळीवर दहशत निर्माण करतोय

वृत्तसंस्था
सिंगापूर

परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आजपासून म्हणजे शनिवारपासून 3 आशियाई देश सिंगापूर, फिलीपिन्स आणि मलेशियाच्या दौऱ्यावर आहेत. दरम्यान, आज सिंगापूरमधील एका कार्यक्रमादरम्यान त्यांनी पाकिस्तानवर वक्तव्य केले आहे. ते म्हणाले की, पाकिस्तान एखाद्या उद्योगाप्रमाणे दहशत निर्माण करतो.

ते म्हणाले की, भारत आता दहशतवाद्यांना बाजूला करण्याच्या मनस्थितीत नाही. भारत यापुढे दहशतवादाच्या समस्येकडे दुर्लक्ष करणार नाही. जयशंकर यांनी सिंगापूरमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस आणि भारतीय लष्कराच्या जवानांनाही श्रद्धांजली वाहिली.



हे चित्र गेल्या वर्षी गोव्यात झालेल्या SCO शिखर परिषदेचे आहे. बैठकीच्या दुसऱ्या दिवशी परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आणि पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो यांची अखेरची भेट झाली.

हे चित्र गेल्या वर्षी गोव्यात झालेल्या SCO शिखर परिषदेचे आहे. बैठकीच्या दुसऱ्या दिवशी परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आणि पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो यांची अखेरची भेट झाली.

जयशंकर सिंगापूरच्या राष्ट्रीय विद्यापीठात त्यांच्या 'व्हाय इंडिया मॅटर्स' या पुस्तकावर चर्चा करत होते. तेव्हा कुणीतरी त्यांना पाकिस्तानवर प्रश्न विचारला. यावर जयशंकर म्हणाले की, प्रत्येक देशाला स्थिर शेजारी हवे आहेत. स्थिर नसेल तर निदान शांत तरी असावेत. पाकिस्तानचे नाव न घेता जयशंकर म्हणाले की, चांगला शेजारी मिळण्यात आपण थोडे दुर्दैवी आहोत.

ते पुढे म्हणाले, जो देश चालवण्यासाठी दहशतवादाचा वापर करतो, हे सत्यही लपवत नाही, त्याच्याशी तुम्ही कसे वागाल. याकडे दुर्लक्ष करून आपण मार्ग काढू शकत नाही.

चीनसोबतच्या भारताच्या संबंधांवर बोलताना जयशंकर म्हणाले की, भारत आणि चीनमध्ये संतुलन कसे निर्माण करायचे हे माझ्यासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे, दोन्ही देश दोन मोठ्या शक्ती आहेत, जे आपापसात शेजारीही आहेत. दोन्ही देशांचा इतिहास आणि त्यांच्या क्षमतांनी त्यांना जगापासून वेगळे केले. अशा परिस्थितीत दोन्ही देशांमधील संवाद सुरू ठेवणे महत्त्वाचे आहे. तथापि, 2020 मध्ये जेव्हा चीनने सीमेवर असे काही केले, तेव्हा आम्हाला आश्चर्य वाटले जे दोन्ही देशांमधील कराराचे उल्लंघन होते. चीनने दोन्ही देशांमध्ये संतुलन निर्माण करण्याऐवजी बिघडवले.

जयशंकर म्हणाले की आमच्यासाठी मोठा मुद्दा हा आहे की सीमा विवाद सोडवायला वेळ लागेल असे वेळोवेळी ऐकायला मिळते. आम्ही याशी सहमत आहोत. पण तोपर्यंत तरी आपण सीमेवर शांतता प्रस्थापित करू शकतो. यामध्ये आम्ही यशस्वीही झालो. 1975 ते 2020 या काळात भारत-चीन सीमेवर एकही मृत्यू झाला नाही.

# केजरीवालांना निष्पक्ष आणि योग्य ट्रायल मिळावी : जर्मनी

## आमच्या कारभारात ढवळाढवळ करू नका

### भारताचे सडेतोड उत्तर

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांच्या अटकेवर बाहेरील देशातून प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. जर्मनी हा पहिला देश आहे ज्याने केजरीवाल यांच्या अटकेवर वक्तव्य केले आहे. जर्मनीच्या परराष्ट्र मंत्रालयाने शुक्रवारी सांगितले की, आम्ही या प्रकरणाची दखल घेतली आहे. केजरीवाल यांची निष्पक्ष आणि योग्य ट्रायल झाली पाहिजे.

जर्मन परराष्ट्र मंत्रालयाच्या या विधानावर भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने आक्षेप घेतला आहे. भारताने जर्मन दूतावासाच्या उपप्रमुखांना बोलावले. वृत्तसंस्था एएनआयने दिलेल्या माहितीनुसार, जर्मनीने भारताच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करू नये, असे त्यांना सांगण्यात आले. या प्रकरणाबाबत आज जर्मनीचे राजदूत परराष्ट्र मंत्रालयात गेले. मात्र, या विषयावर आणखी काय चर्चा झाली याबाबत परराष्ट्र मंत्रालयाने अद्याप कोणतेही अधिकृत वक्तव्य दिलेले नाही.

भारत हा लोकशाही देश आहे. आम्हाला आशा आहे की येथील न्यायालय स्वतंत्र आहे. केजरीवाल यांच्या बाबतीतही लोकशाहीची तत्त्वे पाळली जातील. केजरीवाल यांना कोणत्याही अडथळ्याशिवाय कायदेशीर मदत मिळेल. जर्मनीच्या परराष्ट्र मंत्रालयाने असेही म्हटले आहे की दोषी सिद्ध होईपर्यंत व्यक्तीचे निर्दोषत्व गृहीत धरण्याचे कायदेशीर तत्त्व पाळले गेले. हेच तत्व केजरीवाल यांनाही लागू केले पाहिजे. म्हणजेच दोषी सिद्ध होईपर्यंत त्यांना निर्दोष मानले जावे.



**दिल्लीच्या सरकारी शाळांचे जर्मनी कनेक्शन**

भारतातील शैक्षणिक संस्थांमध्ये जर्मन भाषेच्या अभ्यासासाठी जर्मनीने अनेक दिवसांपासून मोहीम राबवली होती. दरम्यान, 2022 मध्ये दिल्ली शालेय शिक्षण मंडळाच्या रूपाने जर्मनीला भागीदार मिळाला. केजरीवाल सरकारने जर्मनीच्या गोएथे संस्थेशी करार केला. या अंतर्गत दिल्लीच्या सरकारी शाळांमध्ये जर्मन भाषा शिकवण्यास सुरुवात झाली. दिल्लीचे माजी शिक्षण मंत्री मनीष सिसोदिया आणि जर्मनीचे राजदूत वॉल्टर जे लिंडनर यांच्या उपस्थितीत या करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

# केजरीवाल यांच्यानंतर पंजाबच्या मुख्यमंत्र्यांवर अटकेची टांगती तलवार?

वृत्तसंस्था
नवी दिल्ली



दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आपचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांना दिल्लीतील कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी ईडीकडून गुरुवारी (21 मार्च) अटक करण्यात आली. त्यानंतर शुक्रवारी विशेष न्यायालयाने त्यांना सहा दिवसांची ईडी कोठडी सुनावली आहे. तसेच आपचे सरकार असलेल्या पंजाबमध्येही मद्य धोरण प्रकरणी ईडीकडून चौकशी सुरू आहे. अशातच भारतीय जनता पक्षाचे (BJP) पंजाब युनिटचे अध्यक्ष सुनील जाखड यांनी शुक्रवारी सांगितले की, पंजाबमधील मद्य धोरणप्रकरणी सखोल ईडी चौकशीची मागणी केली आहे. त्यामुळे आता अरविंद केजरीवाल यांच्या अटकेनंतर पंजाबमधील आपचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनाही अटक केली जाऊ शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

पंजाबमधील मद्य धोरणप्रकरणी यापूर्वी तीन अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे. त्यामध्ये वित्त आयुक्त (अबकारी) के.ए.पी. सिन्हा, वरुण रुजम व नरेश दुबे यांचा समावेश आहे. या तिन्ही अधिकाऱ्यांनी 2022 मध्ये पंजाबमधील मद्य धोरण तयार केले होते. तसेच या धोरणांतर्गत पंजाबमध्ये मद्यविक्रीसाठी घाऊक परवाने (L1) मिळालेल्या दोन कंपन्यांचे प्रवर्तक दिल्लीतील कथित मद्य धोरण घोटाळ्यातही आरोपी आहेत.

# हिमाचल काँग्रेसच्या 6 बंडखोर आमदारांचा भाजपमध्ये प्रवेश

## 3 अपक्षांनीही भाजपमध्ये प्रवेश केला, सर्वांना पोटनिवडणुकीत पक्षाचे तिकीट

वृत्तसंस्था
शिमला

हिमाचल काँग्रेसच्या सहा बंडखोर आमदारांनी आणि तीन अपक्षांनी शनिवारी दिल्लीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर यांनी पक्षाच्या मुख्यालयात त्यांना पक्षात सामील करून घेतले. हिमाचलमधील राज्यसभा निवडणुकीत या आमदारांनी क्रॉस व्होट केले होते. त्यामुळे काँग्रेसच्या उमेदवारांचा पराभव झाला.

या बंडखोर आमदारांमध्ये सुजानपूरमधून राजेंद्र राणा, धर्मशालामधून सुधीर शर्मा, लाहौल स्पीतीमधून रवी ठाकूर, बडसरमधून इंद्रदत्त लखनपाल, कुतलाहारमधून देवेंद्र कुमार भुट्टो आणि गाग्रेटमधून चैतन्य शर्मा आणि अपक्षांमध्ये देहरामधून होशियार सिंग, नालागढमधून केएल ठाकूर आणि हमीरपूरमधून केएल ठाकूर यांचा समावेश आहे. आशिष शर्मा यांचा समावेश आहे.

केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर म्हणाले की, आमदारांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने पक्ष आणखी मजबूत होईल. हिमाचलमध्ये काँग्रेसची आश्वासने जितकी खोटी होती तितकीच राजस्थान आणि छत्तीसगडमध्येही होती असे ते म्हणाले. सहा आमदारांनी पक्ष सोडणे हा त्याचा पुरावा आहे.

या सर्वांना पोटनिवडणुकीत तिकीट देण्याचे आश्वासन भाजपने दिले आहे. बंडखोर आमदार आता सर्वोच्च न्यायालयात सदस्यत्व वाचवण्यासाठी दिलेली याचिका मागे घेणार असल्याचे सांगण्यात येत आहे. भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर सर्व आमदार आता शिमल्यात परतणार आहेत. शिमला येथील पीटरहॉफ येथे त्यांचे स्वागत करण्यात येणार आहे. माजी मुख्यमंत्री जयराम ठाकूर येथे पत्रकार परिषद घेणार आहेत.

सर्व बंडखोर आमदार २८ फेब्रुवारीपासून राज्याबाहेर असून ते सीआरपीएफच्या सुरक्षा कवचाखाली आहेत. गेल्या आठवड्यातच केंद्रीय गृह मंत्रालयाने कुटुंबाच्या सुरक्षेसाठी 10 CRPF जवानांना त्यांच्या घराबाहेर तैनात केले आहे. हिमाचलमध्ये २७ फेब्रुवारीला राज्यसभेची निवडणूक झाली. काँग्रेसने सर्वोच्च न्यायालयाचे प्रसिद्ध वकील अभिषेक मनु सिंघवी यांना तर भाजपने हर्ष महाजन यांना उमेदवारी दिली. काँग्रेसचे स्वतःचे ४० आमदार होते आणि तीन अपक्षही राज्यसभा निवडणुकीपर्यंत काँग्रेस सरकारचे सहकारी म्हणून काम करत होते. सीएम सखू यांनी निवडणुकीपूर्वी ४३ आमदारांचा दावा केला होता. त्याचवेळी 25 आमदारांसह भाजपने दीड वर्षांपूर्वी काँग्रेसमधून भाजपमध्ये आलेल्या हर्ष महाजन यांना राज्यसभेचे उमेदवार केले आणि सहा काँग्रेस आणि तीन अपक्ष आमदारांच्या पाठिंब्याने 34 मते घेतली.

# रेडी रेकनरमध्ये वाढ, की जैसे थे?

## शासनाच्या निर्णयाकडे मुंबईकराचे लक्ष

**विशेष प्रतिनिधी**
■ मुंबई

जागेची सरकारच्या दृष्टीने निश्चित करण्यात आलेली किंमत म्हणजे रेडी रेकनर अर्थात वार्षिक बाजारमूल्य दर दरवर्षी दि. १ एप्रिलपासून लागू होत असतात . २०२४-२५ या चालू आर्थिक वर्षात रेडी रेकनरचे दर 'जैसे थे' ठेवून नागरिकांना राज्य सरकार दिलासा देते की दरात वाढ करून घरे महाग करणार, याकडे मुंबईकरांसह राज्याच्या लोकांचे लक्ष लागून आहे.

नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठीचे रेडी रेकनरचे दर १ एप्रिलला लागू करण्यात येतात . त्यानुसार मुद्रांक शुल्क विभागाने पुढील आर्थिक वर्षांच्या रेडी रेकनरचे नवे दर प्रस्तावित करण्याचे सुरू केलेले काम अंतिम टप्प्यात आले आहे. यासाठी राज्यात ठिकठिकानी नोंदणी व मुद्रांक विभागाने लोकप्रतिनिधींसमवेत बैठका घेतल्याचे सांगण्यात आले. ग्रामीण व प्रभाव क्षेत्रात रेडी रेकनर मधील दरापेक्षा १५ टक्के अधिक दराने व्यवहार झाले असल्याचे सांगितले होते. तर शहरी भागात रेडी रेकनर मधील दराच्या सात ते आठ टक्के अधिक दराने व्यवहार झाले असल्याचे निदर्शनास आणून देत पुढील आर्थिक वर्षासाठी (२०२४-२५) रेडी रेकरनच्या दरात वाढ प्रस्तावित करण्यात आली असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले होते.

***यंदा वाढ होणार का ?***

*रेडी रेकनरमधील दरवाढ अथवा दर स्थिर ठेवण्याची प्रकियेत कोणतीही निर्णय घेण्यास आचारसंहितेचा अडथळा येणार नाही, असे सांगितले जात आहे. तसेच मागील वर्षीसुध्दा रेडी रेकनरच्या दरात वाढ करण्यात आली नव्हती. त्यामुळे यंदा रेडी रेकनरच्या दरात वाढ करण्याचा प्रस्ताव नोंदणी विभागाकडून शासनाकडे पाठविला आहे. असे असतानाही निवडणुकांमुळे रेडी रेकनरच्या दराबाबत शासन काय निर्णय घेणार याकडे आता लक्ष लागले आहे.*

# 'भारत तोडो' ची भाषा करणाऱ्या गुन्हेगाराला काँग्रेसची उमेदवारी

## काँग्रेस का हाथ दंगाईयों के साथ; भाजपा आ.प्रवीण दरेकर यांची घणाघाती टीका

**प्रतिनिधी**
■ मुंबई



दंगल घडविणे, घातक शस्त्रांचा वापर करणे, शासकीय कर्मचाऱ्यांवर हल्ला करणे असे अनेक गंभीर गुन्हे दाखल असलेल्या साजिद खान पठाण याला काँग्रेसने अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघात उमेदवारी देऊन "काँग्रेस का हाथ, दंगाईयों के साथ " हेच सिद्ध झाले असल्याची घणाघाती टीका भारतीय जनता पार्टीचे विधान परिषदेतील गटनेते आ.प्रवीण दरेकर यांनी शनिवारी केली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत आ.दरेकर बोलत होते. गाजावाजा करत भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून न तुटलेला भारत जोडण्याचे नाटक करणाऱ्या कॉंग्रेसने भारत तोडो ची भाषा करणाऱ्या साजिद खानला उमेदवारी देऊन आपला दुटप्पी चेहरा दाखवला असल्याचेही आ.दरेकर यांनी सांगितले.

आ.दरेकर यांनी यावेळी साजिद खान पठाण याच्याविरुद्ध अकोला शहरातील रामदास पेठ, कोतवाली आणि खदान या तीन पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या 16 गुन्ह्यांची यादीच वाचून दाखवली. नफरत तोडो नव्हे तर नफरत पसरवणे हाच काँग्रेसचा असली चेहरा आहे अशा शब्दात दरेकर यांनी काँग्रेसवर शरसंधान साधले. तब्बल 16 गुन्हे दाखल असलेल्या साजिद खान पठाण याला उमेदवारी देऊन काँग्रेसने 'गुन्हेगार टिकवा आणि गुन्हेगारी वाढवा' असे धोरण अवलंबले आहे. अकोल्यात झालेल्या दंगलीतील साजिद खान पठाण हा मुख्य आरोपी असून अशा गुन्हेगाराला दिलेल्या उमेदवारीचा भारतीय जनता पार्टी कडवा विरोध करत आहे.

गुन्हेगारांना पाठीशी घालत काँग्रेस गुन्हेगारांचे उदात्तीकरण करत आहे अशी टीकाही त्यांनी केली. काँग्रेस या दंगेखोराची उमेदवारी मागे घेणार का असा सवालही आ.दरेकर यांनी उपस्थित केला. आ.दरेकर म्हणाले की अशा अट्टल गुन्हेगाराला उमेदवार म्हणून माथी मारत सर्वसामान्य जनतेवर काँग्रेस घोर अन्याय करत आहे. अशा अट्टल गुन्हेगारांना सूज्ञ मतदार त्यांची खरी जागा आगामी विधानसभा पोटनिवडणुकीत दाखवून देतील असा विश्वास दरेकर यांनी व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पावर विश्वास ठेवत, जातीपाती व पक्षाच्या पलीकडे जाऊन विकासाच्या मुद्द्यावर जनता आगामी निवडणूक हातात घेणार आहे असेही ते म्हणाले.

# मुंबईत मागील 2 वर्षात आढळलेल्या क्षयरुग्णांच्या संख्येत घट

## १२ विभागांमध्ये ६ अति जोखीम गटासाठी विशेष बीसीजी लसीकरण

**प्रतिनिधी**
■ मुंबई



बृहन्मुंबई महानगरपालिका क्षयरोग नियंत्रण विभागाद्वारे रुग्णांना निदान आणि उपचारामध्ये पुरवण्यात येणाऱ्या सेवा, रुग्णांचा नियमित पाठपुराव्यामुळे आणि अत्याधुनिक निदान चाचणी सुविधा यासारख्या सुविधांमुळे क्षयरुग्ण बरे होण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे. औषध प्रतिरोध क्षयरोगाचा २०२० वर्षासाठी क्षयरोग बरा होण्याचा दर ७२ % इतका असून वर्ष २०२१ मध्ये हा दर ७७ % पर्यंत वाढला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत क्षयरोग नियंत्रणासाठी सातत्याने हाती घेण्यात आलेल्या विशेष उपक्रमामुळे रूग्णसंख्येत घट शक्य झाली आहे. वर्ष २०२२ आणि २०२३ दरम्यान नव्याने आढळलेल्या तसेच एकूण क्षय रूग्णांच्या संख्येतही घट झाल्याची आकडेवारी आहे. मुंबईतील रूग्णसंख्येत एकीकडे घट झालेली असतानाच दुसरीकडे मुंबई बाहेरून उपचारासाठी येणाऱ्या रूग्णांच्या संख्येत मात्र वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

सद्यस्थितीत मुंबईत ४२ सीबीनॅट (CBnaat) मशीन, 10 (ट्रूनॅट) Truenat मशीन्स, ३ कल्चर आणि डीएसटी लॅब याद्वारे अत्याधुनिक चाचणी सुविधा उपलब्ध आहेत. तसेच २५ सार्वजनिक क्षेत्रातील आणि ६ खाजगी केंद्रांवर औषध प्रतिरोधी उपचारांची सुविधा ही रूग्णांसाठी मोफत उपलब्ध आहे. तसेच कार्यक्रमामध्ये सहभागी असलेल्या निवडक खाजगी डॉक्टर आणि खाजगी रुग्णालयांमध्ये सुद्धा क्षयरुग्णांचे निदान व उपचार मोफत उपलब्ध आहेत.

क्षयरोग निर्मूलनासाठी आगामी दिवसात जनजागृतीपर संपूर्ण २४ विभागात कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. अतिजोखीम गटातील रूग्णांचे बीसीजी लसीकरण आणि रूग्ण शोधण्यासाठी अत्याधुनिक एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. दक्षा शहा यांनी दिली आहे.

***मुंबईतील रूग्णांच्या संख्येत घट***

*वर्ष २०२३ मध्ये एकूण १ लाख ८२ हजार ८ इतके नमुन्यांची चाचणी करण्यात आली आहे. एकूण क्षयरुग्णांपैकी पुरुष क्षयरुग्ण आणि स्त्री क्षयरुग्ण यांचे प्रमाण जवळपास समान आहे. मुंबईतील रूग्णांच्या संख्येत घट झाल्याचे दोन वर्षांच्या आकडेवारीतून स्पष्ट होते. मुंबईत वर्ष २०२२ मध्ये ५५ हजार २८४ रूग्ण आढळले होते. तर वर्ष २०२३ मध्ये या रूग्णांची संख्या ५० हजार २०६ इतकी आढळली आहे.*

***बीसीजी लसीकरण कार्यक्रम***

*भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (ICMR) आणि राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन प्रकल्प (NTEP) यांचा मुंबईच्या अति जोखमीच्या गटातील लोकसंख्येसाठी प्रौढ बीसीजी लसीकरण कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या राष्ट्रीय कार्यक्रम अंतर्गत मुंबईच्या सर्व २४ विभागात चाचण्या राबविण्यात येणार आहेत. त्यामध्ये १२ विभाग मध्यस्थ (इंटरव्हेंशनल) असतील आणि १२ विभाग हे नियंत्रणाचे विभाग असतील. मध्यस्थ विभागामधील १८ वर्षांपेक्षा जास्त वयोगटातील ६ अतिजोखीम गटातील लाभार्थ्यांची निवड केली जाईल.*

*एकूण ६ अति जोखीम गटामध्ये (१) गत ५ वर्षातील क्षयरोगाने बाधित रुग्ण, (२) मागील ३ वर्षातील क्षयरोग रूग्णांचे घरगुती संपर्कातील व्यक्ती, (३) स्वयंघोषित मधुमेही, (४) स्वयंघोषित धूम्रपान करणारे, (५) कुपोषित, (६) वय ६० वर्षांपेक्षा जास्त अशा रूग्णांचे लसीकरण करण्यात येईल. हे ऐच्छिक लसीकरण आहे, म्हणून पात्र लाभार्थ्यांकडून लेखी संमती घेतली जाईल. त्याची अंमलबजावणी टप्प्य-टप्प्याने केली जाईल. एप्रिल २०२४ मध्ये आरोग्य स्वयंसेविका आणि आशा सेविकांद्वारे पात्र लाभार्थ्यांचे सर्वेक्षण केले जाईल. मे २०२४ मध्ये लसीकरण केले जाईल. उर्वरित नागरिकांच्या लसीकरणासाठी जून, जुलै आणि ऑगस्ट २०२४ मध्ये फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे.*

# मुंबई बंदरातील स्थानिय लोकाधिकार समितीचे अध्यक्ष मिलिंद घनकुटकर यांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळा संपन्न

**प्रतिनिधी**
■ मुंबई




मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता खात्यातील ड्राफ्टमेन्स व मुंबई पोर्ट प्राधिकरण स्थानिय लोकाधिकार समितीचे अध्यक्ष आणि कामगारांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढणारे झुंजार नेते मिलिंद घनगुटकर हे १ एप्रिल २०२४ पासून मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या ३५ वर्षांच्या प्रदीर्घ निष्कलंक सेवेनंतर निवृत्त होत असून, त्यानिमित्ताने मुंबई पोर्ट प्राधिकरण स्थानिय लोकाधिकार समितीच्या वतीने २२ मार्च २०२४ रोजी भाऊचा धक्का येथे मिलिंद घनकुटकर यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते फेटा, शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

मुंबई पोर्ट प्राधिकरण स्थानिय लोकाधिकार समितीच्या वतीने कार्यकर्त्यांनी मिलिंद घनकुटकर यांना एक लाख एकशे अकरा रुपयाची भेट देण्यात आली. सदर रक्कम मिलिंद घनकुटकर यांनी स्थानिय लोकाधिकार समितीला पुढील कार्यासाठी पुन्हा परत केली

मिलिंद घनकुटकर यांच्या सामाजिक व राजकीय कार्यावर आधारित मुंबई पोर्ट प्राधिकरणाचे माजी चेअरमन व महाराष्ट्र सरकारचे लोक उपआयुक्त संजय भाटिया, शिवसेना नेते सुभाष देसाई, खासदार अनिल देसाई, अरविंद सावंत, महासंघाचे सरचिटणीस प्रदीप मयेकर,मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे सरचिटणीस सुधाकर अपराज, मुंबई पोर्ट प्राधिकरणाचे बोर्ड मेंबर दत्ता खेसे, कल्पना देसाई, माजी नगरसेवक अनिल कोकीळ, अरविंद भोसले, शिवसेनेचे विभाग प्रमुख आशिष चेंबूरकर, मनोज जामसुतकर, उपविभाग प्रमुख विजय कामतेकर, मुंबई पोर्ट प्राधिकरणाचे सेवानिवृत्त अधिकारी शेनॉय, पत्नी श्रद्धा घनकुटकर (पत्नी ), प्रणाली घनकुटकर( मुलगी) , आदी मान्यवरांनी मिलिंद घनकुटकर यांच्या सामाजिक व राजकीय कार्यांच्या आधारावर शुभेच्छापर भाषणे केली. शिवसेनेतील नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते नेहमी ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण यावर आधारित सामाजिक कार्य करतात. सत्काराला उत्तर मिलिंद घनकुटकर यांनी दिले.

प्रास्ताविक भाषण मुंबई पोर्ट प्राधिकरण स्थानिय लोकाधिकार समितीचे माजी कार्याध्यक्ष व महासंघाचे पदाधिकारी नंदू राणे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समितीचे कार्याध्यक्ष बबन शिरोडकर व संदीप चेरफळे यांनी केले.

# डिजिटल माध्यमांनी माहिती प्रसारणाची गती अन् देवाणघेवाण प्रक्रियाही वाढवली: मनोज पाटील

## भारतीय युवा पिढीला जपानी भाषा क्षेत्रात करिअरच्या मोठ्या संधी: दीपक शिकारपूर

## डिजिटल मिडिया क्षेत्रात स्वत:ची आचारसंहिता महत्वाची: राजा माने

■ पुणे




सुरुवातीच्या काळामध्ये माहितीचे प्रसारण करण्यासाठी किमान २४ तासाचा कालावधी लागत होता परंतु इलेक्ट्रॉनिक माध्यमातून तो वेळ कमी झाला परंतु या दोन्ही माध्यमांमध्ये असणाऱ्या मर्यादा लक्षात घेता नव्याने उदयास आलेले डिजिटल मीडिया हे कसे प्रभावी माध्यम असून यातून वेळ आणि ठिकाणाच्या मर्यादा सीमा ओलाडणारे अन खिशातच अपडेटेड बातम्या देण्यापर्यंत डिजिटल मीडिया माध्यमांनी मजल मारली आहे हे अत्यंत प्रभावी असून यातून देवाण-घेवाणही तेवढ्याच तत्परपणे काही क्षणामध्ये मिळत असल्याने आगामी काळात या डिजिटल मीडिया या नव्या माध्यमाचे भविष्य उज्वल असल्याचे मत पुण्याचे अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार राजा माने उपाध्यक्ष जेष्ठ पत्रकार नंदकुमार सुतार व संगणक तज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर उपस्थित होते.

आजच्या काळामध्ये नव्या तंत्रज्ञानामुळे आपल्याला आवश्यक असलेली माहिती काही सेकंदामध्ये आपल्या हातातील मोबाईल मध्ये मिळत असली तरी सुद्धा त्याची सत्यता ही निर्मित संस्थेवरती अवलंबून असते सध्या जगामध्ये अनेक नवनवीन तंत्रज्ञान विकसित झाल्यामुळे माहीती थेट मिळत असली तरी सुद्धा या माहितीची अचूक आणि थेट नेमकी माहिती डिजिटल प्रतिनिधींकडेच असते. या नव्या तंत्रज्ञानाचा कायद्यांच्या चौकटीत बसून कसा फायदा घ्यायचा याबाबत यावेळी मनोज पाटील यांनी मार्गदर्शन केले.

संगणक तज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर यांनी डिजिटल माध्यमांचे बदलते स्वरूप अन् डिजिटल मीडिया या क्षेत्रात काम करताना तंत्रज्ञानाचा वापर या विषयावरती विश्लेषण करताना आगामी काळातील माध्यमांवरील आव्हाने आणि या आव्हानातही डिजिटल मीडियाचे अस्तित्व कसे अबाधित राखायचे याबाबत सखोल विश्लेषण केले. सध्या जगामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जोरावरती कोणतीही रचना करण्यात येत असली तरी यामध्ये कोणती काळजी घ्यायची या विषयावरती सखोल विश्लेषण करणार आहे तर नव्या आव्हानांना सामोरे जाताना संगणकाचा या डिजिटल माध्यमातून कसा फायदा होत आहे आणि यातून नक्की काय साध्य करता येईल या विषयावरती ही विश्लेषण केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. राजा माने यांनी अनुभवाच्या जोरावर बदलत्या आव्हानांना कसे सामोरे जायचे अन् तंत्रज्ञानाच्या वाढत्या भडिमारामध्ये आपल्या डिजिटल माध्यमांची विशेष पकड आणि वेगळेपण हेच आगामी काळात या आव्हानांना सामोरे जाण्यास ताकद दिल्याशिवाय राहणार नाही असे सांगून विविध विषयावरती डिजिटल माध्यमांनी आपली मते व्यक्त करण्याचे आवाहन केले. तर पुणे शहर विभागाच्या वतीने ही एक अनोखी संधी निर्माण केल्यामुळे तंत्रज्ञान आणि कायदे या विषयावरती सखोल चर्चा करण्यास एक हक्काचे व्यासपीठ मिळाल्याचे कायदे आणि तंत्रज्ञान ही डिजिटल मीडिया साठी कायमच हातामध्ये हात घालून जाणारी गोष्ट आहे आणि डिजिटल मीडिया म्हटलं की वेळ आणि त्यावरची कसरत ही साध्य करताना प्रत्यक्ष काम करणाऱ्या पत्रकारांना कोणती काळजी घ्यावी याविषयीही माहिती दिली.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रामध्ये नंदकुमार सुतार (संपादक) यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञान डिजिटल माध्यमांसाठी कशी वरदायीनी आहे हे स्पष्ट करून सांगताना याबाबत विस्तृत माहिती दिली. या बदलत्या तंत्रज्ञानानुसार परदेशात दैनंदिन वापरले जाणारे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञान हे डिजिटल पन्नकारिता किती फायदेशीर आहे याची माहिती देत फक्त याबाबत कोणत्या दक्षता घेतल्या पाहिजेत याविषयीही मार्गदर्शन केले. याबाबत माध्यमतज्ञ चंद्रकांत भुजबळ यांनी डिजिटल माध्यमांसाठी उपलब्ध कायदे आणि डिजिटल माध्यमांची विश्वासहार्यता याबाबत मार्गदर्शन केले तर विधीज्ञ अतुल पाटील यांनीही माध्यमांसाठी आचारसंहिता आणि कायदे या विषयावरती सखोल विश्लेषण केले.

कार्यक्रमाचे आयोजन माऊली म्हेत्रे : राज्य संघटक, महेश टेळे पाटील : अध्यक्ष पुणे शहर, हर्षद कोठावडे कार्याध्यक्ष पुणे शहर, धनराज माने,कार्याध्यक्ष पुणे शहर, केतन महामुनी : सहसचिव यांनी केले होते .सतीश सावंत उपाध्यक्ष, विकास भोसले पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष, महेश कुगांवकर : सचिव, राज्य संघटक : संजय कदम,शरद लोणकर, अमोल पाटील, मुंबई विभाग अध्यक्ष: संजय भैरे , तेजस राऊत, सातारा जिल्हा अध्यक्ष गणेश बोतालजी, पुणे जिल्हा अध्यक्ष अजिंक्य स्वामी,पिंपरी-चिंचवड अध्यक्ष विकास शिंदे, गणेश हुंबे यांच्यासह डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# नारायण राणे केवळ एक व्यक्ती नव्हे तर कोकणचा विकास त्यांच्यावर अवलंबून - दीपक केसरकर

■ सिंधुदुर्ग



आगामी लोकसभा निवडणुकीत रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातील उमेदवारीवरुन महायुतीत तिढा निर्माण झाला आहे. या लोकसभा मतदारसंघातून शिंदे गटाचे किरण सामंत आणि भाजपचे नारायण राणे यांच्यामध्ये उमेवारीसाठी स्पर्धा सुरु आहे. या पार्श्वभूमीवर शिंदे गटाचे नेते दीपक केसरकर यांनी नारायण राणे यांच्या उमेदवारीला समर्थन देणारे वक्तव्य केले आहे. नारायण राणे ही केवळ एक व्यक्ती नव्हे तर त्यांच्यावर संपूर्ण जिल्ह्याचा विकास अवलंबून आहे, असे वक्तव्य दीपक केसरकर यांनी केले. ते सोमवारी सिंधुदुर्गात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

यावेळी त्यांना नारायण राणे यांच्या लोकसभा उमेदवारीबाबत विचारणा करण्यात आली. सिंधुदुर्गात नारायण राणे यांच्यासारखा आक्रमक नेता निवडून आला तर तुम्हाला आवडेल का, असा प्रश्न दीपक केसरकर यांना विचारण्यात आला. यावर दीपक केसरकर यांनी म्हटले की, नारायण राणे ही फक्त एक व्यक्ती नाही, त्यांच्यासोबत आमचं सिंधुदुर्गाचं मंत्रिपद आहे. आमचा पुढचा विकास त्यावर अवलंबून आहे. आज त्यांना राज्यसभेचे तिकीट मिळालेले नाही. ते लोकसभेवर निवडून आले तर ते मंत्री बनण्याची त्यांची क्षमता आहे. त्यामुळे आपल्या जिल्ह्याला मिळणारं केंद्रीय मंत्रिपद घालवायचे का, याचा विचार जनतेने केला पाहिजे. मी नाही, माझं कसं आहे, एखादा संघर्ष झाला तर तो विषयापुरता मर्यादित असतो. आम्ही कोकणी लोक आहोत, आमचा जिल्हा आमच्यासाठी प्राधान्याचा विषय आहे. कोकणातील माणूस कधीच कोणाकडे मागत नाही, कर्जमाफी मागत नाही, फक्त कधीतरी मदतीची गरज लागते. पण विकासाची गंगा कोकणात येण्याची आवश्यकता आहे, असे दीपक केसरकर यांनी म्हटले.

सध्या रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघासाठी शिंदे गट आणि भाजप यांच्यामध्ये रस्सीखेच सुरु आहे. हा मतदारसंघ पूर्वी शिवसेनेकडे असल्याचे सांगत शिंदे गट किरण सामंत यांच्या उमेदवारीसाठी आग्रही आहे. मात्र, एकेकाळी नारायण राणे यांचे कट्टर विरोधक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दीपक केसरकर यांनी राणेंच्या उमेदवारीला समर्थन दिल्याने राजकीय वर्तुळाच्या भुवया उंचावल्या आहेत.

**नारायण राणे आणि उदय सामंत यांच्या गुप्त बैठक**

रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघाचा तिढा सोडवण्यासाठी काही दिवसांपूर्वी नारायण राणे आणि मंत्री उदय सामंत यांच्यामध्ये जुहू बंगल्यावर गुप्त बैठक पार पडली होती. मात्र, त्यानंतरही हा मतदारसंघ कोण लढवणार, या प्रश्नाचे उत्तर मिळू शकले नव्हते. नारायण राणे हे लोकप्रियतेच्या शिखरावर असताना रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे दोन्ही जिल्हे नारायण राणे यांचे बालेकिल्ले मानले जायचे. पण सध्याच्या घडीला नारायण राणे यांनी ताकद सिंधुदुर्ग जिल्ह्यापुरती मर्यादित झाली आहे. रत्नागिरीतील भाजप आणि शिंदे गटाचे नेते नारायण राणे यांना कितपत पाठिंबा देतील, याबाबत शंका आहे. त्यामुळे नारायण राणे सिंधुदुर्गातून लोकसभा निवडणूक लढवणार का, हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही.

**जाहीर सूचना**

मी जुगल किशोर डोगरा या नोटिशीद्वारे सर्वसामान्य जनतेला सूचित करतो की की मी २९- सी आणि डी, डोगरा पंप्स , शक्ती इंडस्ट्रिअल इस्टेट सीएसएल, पिरामल नगर, ऑफ एस.व्ही. रोड, पेट्रोल पंपाच्या बाजूला, गोरेगाव (प), मुंबई -62 या आवाराचा मालक असून, दि. २० मार्च २०२४ रोजी स. १०.३० वा. पिरमाल नगर, एस.व्ही. रोड, गोरेगाव (प.), मुंबई येथे माझ्या स्कूटीवरून प्रवास करताना माझ्या फेक्टरीचे मूळ अग्रीमेंट चे कागदपत्र गहाळ झाले आहे. या बद्दल मी गोरेगाव पोलीस ठाण्यात तक्रारही दाखल केलेली आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्राची यादी**

१. शिवशंकर महेश्वरी यांचे नावे असलेला मूळ करारनामा.

२. मूलचंद लखमशी नागदा आणि हेमचंद लखमशी नागदाचे नावे असलेला मूळ करारनामा.

३, किरण चंदूलाल पटेल यांचे नावे असलेला मूळ करारनामा.

जर कोणाला ही कागदपत्रे मिळाल्यास खालील पत्त्यावर किंवा गोरेगाव पोलीस ठाण्यात द्यावे ही विनंती.

**जुगल किशोर डोगरा**
डोगरा पंप्स
29- सी आणि डी, शक्ती इंडस्ट्रिअल इस्टेट सीएसएल,
पिरामल नगर, ऑफ एस.व्ही. रोड,
पेट्रोल पंपाच्या बाजूला, गोरेगाव (प), मुंबई -62
मो. क्र. - 9820668587

# लोकसभा सार्वत्रिक निवडणूक मतदानासाठी 'इपिक'सह बारा ओळखपत्र ग्राह्य

■ नागपूर



लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 करिता निवडणूक आयोगाने मतदान करण्यापूर्वी मतदारांची ओळख पटविण्याकरिता मतदान ओळखपत्रासह (EPIC) 12 प्रकारचे ओळखीचे पुरावे ग्राह्य धरलेले आहे.

नागपूर आणि रामटेक लोकसभा क्षेत्रात 19 एप्रिलला मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी स्वतःची ओळख पटविण्याकरिता निवडणूक आयोगाने बारा प्रकारचे ओळखीचे पुरावे ग्राह्य धरले आहे. त्यामुळे आता लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदान करताना मतदारांची ओळख पटविणे शक्य होणार आहेत. या ओळखपत्रात आधार कार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक व पोस्ट ऑफिसने जारी केलेल्या फोटोसह पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेअंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅन कार्ड, कामगार मंत्रालयाने जारी केलेले स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, छायाचित्रासह पेन्शन दस्तऐवज, केंद्र व राज्य सरकार / पीएसयू / पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना दिलेली छायाचित्र असलेली सेवा ओळखपत्रे, खासदार, आमदार यांना जारी केलेल्या अधिकृत ओळखपत्रांचा समावेश आहे. यामुळे लोकसभा निवडणुकीत मतदारांना मतदान करताना कोणतीही अडचण येणार नाही. ते आपला मतदानाचा हक्क बजावू शकतील.

मराठी अक्रॉस मुंबई

## संपादकीय

# प्रदूषणाचा भस्मासुर रोखा



स्विस संस्था आयक्युएअर ने जागतिक प्रदूषणावर एक अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक आहे कारण या अहवालात भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून बिहारमधील बेगुसराई हे जगातील सर्वाधिक प्रदूषित महानगर क्षेत्र तर जगातील १३४ देशांच्या राजधानीच्या शहरांपैकी दिल्ली हे सर्वात प्रदूषित राजधानीचे शहर असल्याची नोंद या अहवालात करण्यात आली आहे. या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३४ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ७३०० शहरांची माहिती संकलित करण्यात आली. या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, मुंबई, बेगुसाराई, गुवाहाटी, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई यासारख्या मोठ्या आणि महत्वाच्या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले. स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर आली होती. प्रदूषणामुळे दिल्लीत खेळला जाणारा रणजी सामना रद्द करावा लागला होता. चार वर्षांपूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणामुळे रद्द करावा होता त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली होती. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई - दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम - विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल.

# भारतात स्वच्छ स्वयंपाक इंधनाचा प्रवेश: धोरणांची अशी होत आहे मदत

जागतिक आरोग्य संघटना (WHO) नुसार, स्वच्छ इंधन आणि तंत्रज्ञान म्हणजे अशी इंधने आणि तंत्रज्ञान ज्यांच्यामुळे अतिसूक्ष्म कण (PM2.5) आणि कार्बन मोनोऑक्साइड (CO) ची पातळी जागतिक आरोग्य संघटनेच्या जागतिक हवा गुणवत्ता मार्गदर्शक सूत्रांशी (2021) मेळ खातात. इंधन आणि तंत्रज्ञानांचे संयोजन स्वच्छ मानले जाते, जर ते PM2.5 साठी वार्षिक सरासरी हवा गुणवत्ता मार्गदर्शक पातळी (AQG, 5 μg/m3 [माइक्रोग्रॅम प्रति घनमीटर]) किंवा अंतरिम लक्ष्य 1 पातळी (IT1, 35 μg/m3) आणि CO साठी 24 तासांची सरासरी हवा गुणवत्ता मार्गदर्शक पातळी (AQG, 4 mg/m3) किंवा अंतरिम लक्ष्य 1 पातळी (IT1, 7 mg/m3) यापैकी एखादी गाठते. या व्याख्येनुसार, जागतिक आरोग्य संघटना सौर, वीज, बायोगॅस, नैसर्गिक वायू, द्रवीभूत पेट्रोलियम वायू (LPG) आणि इथेनॉलसारख्या अल्कोहोल इंधनांना घरातील PM आणि CO उत्सर्जनासाठी स्वच्छ स्वयंपाक इंधन म्हणून वर्गीकृत करते.

SDG 7 (स्वच्छ स्वयंपाक इंधनाचा प्रवेश वाढवणे) प्रगतीचा मागोवा घेणारा अहवाल नोंदवतो की, 2021 मध्ये जागतिक लोकसंख्येपैकी 71 टक्के लोकांना स्वच्छ स्वयंपाक इंधन आणि तंत्रज्ञान उपलब्ध होते. याचा अर्थ असा होतो की, सुमारे 2.3 अब्ज लोक अजूनही स्वयंपाकाच्या बहुतेक वेळा प्रदूषणकारी इंधन आणि तंत्रज्ञान वापरत आहेत. SDG ची लक्ष्ये गाठण्याचे लक्षित वर्ष 2030 असूनही, त्यावेळी केवळ 77 टक्के जागतिक लोकसंख्येलाच स्वच्छ स्वयंपाक इंधनाची सुविधा मिळण्याची अपेक्षा आहे. म्हणजेच, 1.9 अब्ज लोकांना अजूनही घन इंधन (बायोमास, लाकूड, कोळसा, शेती आणि प्राणीजन्य कचरा) आणि केरोसीन तेलावर अवलंबून राहावे लागणार आहे.

आशिया, विशेषत: भारत येथे आधुनिक स्वयंपाक इंधनाची उपलब्धता वाढण्यामागील मुख्य कारण म्हणजे वायुजनित इंधनांची, विशेषत: एलपीजीची सबसिडी असलेली उपलब्धता आहे.

ज्यांना आधुनिक स्वयंपाक इंधनाची सुविधा नाही असे बहुतेक लोक हे आफ्रिका आणि आशिया खंडातील जगातील गरीब आणि विकसित होत असलेल्या देशांमध्ये राहतात. 2000 च्या दशकापासून आशियातील देश, विशेषत: भारत, यांनी स्वयंपाक इंधनाची उपलब्धता लक्षणीयरीत्या वाढवली आहे. तर आफ्रिकेतील स्वरुप हे स्थिरतेचे किंवा स्वयंपाक इंधनाची सुविधा नसलेल्या लोकांच्या संख्येत वाढीचे आहे. आशिया, विशेषत: भारत येथे आधुनिक स्वयंपाक इंधनाची उपलब्धता वाढण्यामागील मुख्य कारण म्हणजे वायुजनित इंधनांची, विशेषत: एलपीजीची सबसिडी असलेली उपलब्धता आहे.

घरातील संपत्ती आणि सामाजिक-आर्थिक स्थिती (मुख्यतः उच्च शिक्षण) ही स्वच्छ स्वयंपाक इंधनाची उपलब्धता आणि स्वीकृती यांचे ज्ञात चालक आहेत. उदाहरणार्थ, पश्चिम युरोप आणि उत्तर अमेरिकेतील विकसित देशांचे प्रति व्यक्ती जीडीपी (सकल राष्ट्रीय उत्पादन) 20,000 अमेरिकन डॉलरपेक्षा जास्त आहे आणि त्यांच्या सर्व घरांमध्ये स्वच्छ स्वयंपाक इंधनाची सुविधा आहे. काही विकसित देश, जसे की भारत, यांनी स्वच्छ स्वयंपाक इंधनाची उपलब्धता प्रदान करण्यासाठी वेगळ्या दृष्टिकोनाचा अवलंब केला आहे. लाखो घरांना उत्पन्न आणि सामाजिक-आर्थिक स्थिती पाहून स्वच्छ स्वयंपाक इंधने परवडणारी आणि स्वस्त होईपर्यंत वाट पाहण्यापेक्षा, धोरण आखून स्वच्छ स्वयंपाक इंधनांवर, जसे की एलपीजीवर सबसिडी दिली जाते. त्यामुळे, 2022 मध्ये भारताचे प्रति व्यक्ती जीडीपी फक्त 2410 अमेरिकन डॉलर (चालू अमेरिकन डॉलर) असूनही, सुमारे 60 टक्के घरांमध्ये एलपीजीची उपलब्धता वाढवली आहे. पश्चिम आफ्रिकेतील कोटे डी'आयवरमध्ये, स्वच्छ स्वयंपाक इंधनाची सुविधा असलेल्या घरांची टक्केवारी फक्त 32 टक्के आहे, परंतु त्यांचे प्रति व्यक्ती जीडीपी भारताच्या बरोबरीचे आहे. स्वच्छ स्वयंपाक इंधनाच्या उपलब्धतेमधील फरक या दोन देशांमधील धोरणातील हस्तक्षेप स्पष्ट करतात.

काही विकसित देश, जसे की भारत, यांनी स्वच्छ स्वयंपाक इंधनाची उपलब्धता प्रदान करण्यासाठी वेगळ्या दृष्टिकोनाचा अवलंब केला आहे.

दक्षिण आशियाची परिस्थिती



दक्षिण आशियातील स्वच्छ स्वयंपाक इंधनाची सुविधा असलेल्या घरांच्या प्रमाणात आणि प्रति व्यक्ती जीडीपी मध्ये असलेला विस्तार हा, ऊर्जा समानतेने पुरविण्याच्या बाबतीत बाजारपेठेच्या मर्यादा भरून काढण्यासाठी धोरण कशी भूमिका बजावू शकते याचे उदाहरण आहे. दक्षिण आशियाई देशांपैकी मालदीवचा 2022 मध्ये प्रति व्यक्ती सर्वाधिक जीडीपी 11,780 अमेरिकन डॉलर (चालू अमेरिकन डॉलर) इतका होता आणि तेथील सर्व घरांमध्ये (100%) स्वच्छ स्वयंपाक इंधनाची सुविधा होती. भूतान, ज्याचा प्रति व्यक्ती जीडीपी 3560 अमेरिकन डॉलर इतका आहे, तो दक्षिण आशियातील दुसरा सर्वाधिक जीडीपी असलेला देश आहे. तिथे 87 टक्के घरांमध्ये स्वच्छ स्वयंपाक इंधनाची सुविधा होती. तथापि, श्रीलंकेचा तुलनात्मक असाच 3354 अमेरिकन डॉलर इतका जीडीपी असूनही, फक्त 33 टक्के घरांमध्ये स्वच्छ स्वयंपाक इंधनाची सुविधा होती. श्रीलंकेचा प्रति व्यक्ती जीडीपी हा अफगाणिस्तानाच्या प्रति व्यक्ती जीडीपी पेक्षा जवळपास 10 पट जास्त होता, तरीही अफगाणिस्तानात स्वच्छ स्वयंपाक इंधनाची सुविधा असलेल्या घरांची टक्केवारी 35 टक्के इतकी जास्त होती. बांग्लादेशने 2020 मध्ये भारताचा प्रति व्यक्ती जीडीपी मागे टाकला आणि 2022 मध्ये बांग्लादेशाचा प्रति व्यक्ती जीडीपी 2688 अमेरिकन डॉलर इतका होता, जो भारतापेक्षा (2410 अमेरिकन डॉलर) जास्त होता. असूनही, दक्षिण आशियाई देशांमध्ये स्वच्छ स्वयंपाक इंधनाची सुविधा असलेल्या घरांची टक्केवारी बांग्लादेशात सर्वात कमी होती, ती 27 टक्के इतकी होती, तर भारतामध्ये एलपीजी आणि पाईप्ड नैसर्गिक वायूची सुविधा असलेल्या घरांची टक्केवारी जवळपास 60 टक्के होती. दक्षिण आशियाई देशांमध्ये स्वच्छ स्वयंपाक इंधनाची सुविधा असलेल्या घरांच्या टक्केवारीतील हा मोठा फरक फक्त घरातील संपत्तीद्वारेच नाही तर धोरणात्मक हस्तक्षेपांमुळेही स्पष्ट केला जाऊ शकतो.

समस्या

स्वच्छ स्वयंपाक इंधनाची उपलब्धता सुधारण्यासाठी केलेले उपक्रम भारतात सुरुवातीला राज्यस्तरावर झाले. 1990 च्या दशकाच्या उत्तरार्धात एलपीजीची टंचाई कमी झाल्यानंतर, काही दक्षिणेकडील राज्य सरकारांनी दारिद्र्य रेषेखालील (BPL) घरांना अनुदानित किंवा मोफत एलपीजी देण्यासाठी विशेष कार्यक्रम सुरू केले. हे मॉडेल राज्यस्तरावर एलपीजी कार्यक्रम राबवणाऱ्या सरकारांना राजकीय वाढ करण्यासाठी यशस्वी ठरले आणि 2009 मध्ये केंद्र सरकारने राजीव गांधी ग्रामीण एलपीजी वितरण (RGGLV) योजना म्हणून त्याचा अवलंब केला. या योजनेमुळे ग्रामीण भागात एलपीजी विक्रेत्यांची संख्या दुपटीने वाढली आणि त्यामुळे ग्रामीण भागात एलपीजीची उपलब्धता वाढण्यास मदत झाली. नंतर 2014 मध्ये हा कार्यक्रम काही सुधारणांसह प्रधान मंत्री उज्ज्वला योजना म्हणून पुन्हा सुरू करण्यात आला, ज्या अंतर्गत अनुदानित दरात एलपीजी उपलब्ध करून देण्यात आले. मतदानाचा अधिकार असलेल्या सर्वसामान्य लोकांना लक्ष्य करणाऱ्या एलपीजी उपलब्धतेच्या कार्यक्रमांचा राजकीय फायदा होतो हे नाकारता येत नाही, परंतु या कार्यक्रमांमुळे गरीब कुटुंबांचे कल्याणही होते.

एलपीजीवर अनुदान देणे हे वादग्रस्त आहे. मुक्त अर्थव्यवस्थेचे तत्त्वज्ञान सांगणारे अर्थशास्त्रज्ञ स्पष्टपणे सांगतात की, ऊर्जा अनुदानांचा, विशेषत: जीवाश्म इंधन अनुदानांचा (एलपीजी स्वच्छ इंधन असूनही त्याचा समावेश) अर्थव्यवस्थेवर निव्वळ नकारात्मक परिणाम होतो. ते कृत्रिमरित्या जीवाश्म इंधनाच्या किमती कमी करतात, ज्यामुळे बाजारपेठेत विकृती निर्माण होते ज्याचा पर्यावरणीय, आर्थिक आणि सामाजिक परिणाम होतो. ते ऊर्जा वापर आणि हरितगृह वायू (GHG) उत्सर्जन वाढवतात, सरकारी तिजोरीवर ताण येतो, आरोग्यसेवा किंवा शिक्षणसारख्या सामाजिक मुद्द्यांवर करता येणारा खर्च कमी होतो आणि पर्यायी ऊर्जा स्रोतांमुळे मिळणारा नफा कमी होतो.

काही दक्षिणेकडील राज्य सरकारांनी दारिद्र्य रेषेखालील (BPL) घरांना अनुदानित किंवा मोफत एलपीजी देण्यासाठी विशेष कार्यक्रम सुरू केले.

मात्र, स्वच्छ स्वयंपाक इंधनावर अनुदान देण्याबाबत कल्याणकारी दृष्टिकोनाचा कमी अभ्यास केला जातो. स्वच्छ इंधनाची उपलब्धता ही काही स्वरूपाच्या अनुदानाची हमी देते हे नकारता येत नाही. स्वयंपाक इंधनाच्या अंतिम वापर कार्यक्षमतेचा विचार केला तर, गरिबांना लाकूड किंवा इतर बायोमास-आधारित इंधनासाठी एलपीजीच्या तुलनेत जास्त खर्च येतो. स्वच्छ स्वयंपाक इंधनावर अनुदान देणे हे गरिबांना स्वयंपाक इंधनाचा खर्च कमी करण्यास मदत करते, ज्यामुळे अन्न आणि औषधासारख्या इतर आवश्यक वस्तूंवर खर्च करण्यासाठी आर्थिक बचत होते. तसेच, घरातील हवेच्या प्रदूषणाशी संबंधित आरोग्य समस्या टाळण्यासही मदत होते.

भारतातील एलपीजी सबसिडी, त्यांच्या संदर्भातील परिणामकारकता, कल्याणकारी फायदे आणि किफायतशीरपणा याद्वारे एकत्रितपणे निव्वळ नकारात्मक नाहीत. परिणामकारकतेच्या दृष्टीकोनातून, थेट लाभ हस्तांतरण मॉडेलद्वारे गरिबांचा समावेश आणि बहिष्काराच्या त्रुटी कमी करून ज्या लोकांसाठी ते अभिप्रेत आहेत त्यांच्यापर्यंत सबसिडी पोहोचते. ऊर्जा उपलब्ध करून देण्याचे कल्याणकारी फायदे (महिला साक्षरता आणि उत्पादक क्रियाकलापांमध्ये वाढ, सुधारित आरोग्य, विशेषत: घरातील महिला आणि मुलांचे श्वसन आरोग्य) बहुतेकदा सबसिडी प्रदान करण्याच्या दीर्घकालीन खर्चापेक्षा जास्त असतात.

सबसिडी व्यवस्था अशी केली आहे की ती कमीत कमी किमतीत सेवा प्रदान करण्यास प्रोत्साहन देते कारण एलपीजी मध्ये पाईप्स किंवा ट्रान्समिशन लाईन सारख्या विस्तृत पायाभूत सुविधांचा समावेश नाही. हा एक पैलू आहे ज्यामुळे एलपीजी सबसिडी खेड्यातील दुर्गम ग्रामीण भागात गॅस पाइपलाइन किंवा वीज वितरण पायाभूत सुविधा (आणि सेवा वितरण) पेक्षा अधिक किफायतशीर बनते. किफायतशीरतेचा अर्थ असा आहे की गरीब आणि ग्रामीण लोकसंख्येला सेवा देण्यासाठी एलपीजी वितरकांना प्रोत्साहन देताना अनुदान सर्वात कमी कार्यक्रम खर्चात सामाजिक उद्दिष्टे साध्य करते.

सबसिडी व्यवस्था अशी केली आहे की ती कमीत कमी किमतीत सेवा प्रदान करण्यास प्रोत्साहन देते कारण एलपीजी मध्ये पाईप्स किंवा ट्रान्समिशन लाईन सारख्या विस्तृत पायाभूत सुविधांचा समावेश नाही.

बाजार व्यवस्था वस्तू आणि सेवांचे कार्यक्षम वितरण सुनिश्चित करते परंतु श्रीमंत आणि गरीब यांच्यात समानता आणत नाही. सरकारी धोरणाचा हस्तक्षेप गरिबांसाठी बाजार यंत्रणेच्या संथ फायद्यांची प्रतीक्षा करण्याऐवजी तात्काळ स्वच्छ इंधन उपलब्ध करून देऊ शकतो. आर्थिक वाढ आणि ऊर्जा वापर एकमेकांवर प्रभाव टाकतात. गरीब कुटुंबांमध्ये जास्त ऊर्जेचा वापर महिलांमध्ये शिक्षण आणि रोजगार वाढवते, जे शेवटी आर्थिक वाढीस हातभार लावते. ऊर्जा गरीबी आणि अनुदाने एकमेकांशी जोडलेली आहेत. सबसिडी देऊन ऊर्जा दारिद्र्य कमी करता येते आणि सामाजिक कल्याण वाढवता येते.सबसिडी काढून टाकण्याऐवजी, SDG7 द्वारे लक्ष्यित केल्यावर गरिबी कमी करण्यासाठी आणि सर्वांसाठी स्वच्छ, परवडणारी आणि शाश्वत ऊर्जेमध्ये प्रवेश करण्यासाठी आपल्याला ऊर्जा सबसिडीमध्ये नवनवीन उद्दिष्ट ठेवण्याची गरज आहे.

# युरोपियन युनियन-भारत मुक्त व्यापार करार: GDPR च्या अडथळ्यावर कसा मात करेल?

युरोपियन युनियनसोबत व्यापार वाढवण्यासाठी भारत त्याच्याशी मुक्त व्यापार करार (FTA) बोलणी करत आहे. परंतु युरोपचे डेटा संरक्षण कायदे, विशेषत: जनरल डेटा प्रोटेक्शन रेग्युलेशन (GDPR) त्याच्या मार्गात अडथळे निर्माण करू शकतात. जीडीपीआर मुळे व्यवसाय करण्याचा खर्च खूप वाढतो. अशा परिस्थितीत, मुक्त व्यापार करारावरील वाटाघाटींचे यश जीडीपीआर चा प्रश्न कसा सोडवला जातो यावर अवलंबून असेल.

जीडीपीआर भारतीय निर्यातीमध्ये अडथळा आहे?

जीडीपीआरच्या नियमांचे पालन न केल्यास मोठ्या दंडाची तरतूद आहे. ही रक्कम कंपनीच्या वार्षिक कमाईच्या 4 टक्के किंवा 20 दशलक्ष युरोपर्यंत असू शकते. युरोपियन युनियनच्या नियामक संस्था या कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करतात. हेच कारण आहे की 2021 मध्ये, त्याच्या उल्लंघनाच्या 434 प्रकरणांमध्ये 1.27 अब्ज युरोची रक्कम दंड म्हणून वसूल करण्यात आली. याचा अर्थ कायद्याच्या उल्लंघनाच्या प्रत्येक प्रकरणात सरासरी 2.94 दशलक्ष युरोचा दंड आकारण्यात आला. अशा परिस्थितीत, युरोपियन युनियनशी फारच कमी व्यापार असला तरीही, या कायद्यांचे उल्लंघन करणे हा व्यावहारिक पर्याय नाही. ज्या कंपन्या युरोपियन युनियनमध्ये बाजारपेठ शोधत आहेत त्यांनी देखील या नियमांचे पालन केले पाहिजे कारण युरोपीय लोक वैयक्तिक डेटाबद्दल खूप संवेदनशील आहेत. जर एखादी कंपनी डेटा गोपनीयतेचा आदर करत नसेल तर युरोपमधील लोकांमध्ये तिची प्रतिमा नकारात्मक होईल. हे कंपनीच्या प्रतिष्ठेसाठी आणि भविष्यात तिच्या व्यावसायिक संभावनांसाठी चांगले होणार नाही.

ज्या कंपन्या युरोपियन युनियनमध्ये बाजारपेठ शोधत आहेत त्यांनी देखील या नियमांचे पालन केले पाहिजे कारण युरोपीय लोक वैयक्तिक डेटाबद्दल खूप संवेदनशील आहेत.

2023 मध्ये भारतीय संसदेत 'डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट' मंजूर करण्यात आला होता, परंतु त्याचे नियम अद्याप अधिसूचित केलेले नाहीत. यामुळेच बहुतांश भारतीय कंपन्यांना गोपनीयता कायद्यातील कठोर तरतुदींची माहिती नाही. त्यांना युरोपियन युनियनच्या कायद्यांची माहिती नाही. त्यामुळेच जीडीपीआरने व्यापारी आणि निर्यातदारांवर नियम आणि नियमांचा अतिरिक्त भार टाकला आहे. त्यामुळे त्यांच्या व्यवसायावर परिणाम होत आहे. युनायटेड स्टेट्स ट्रेड रिप्रेझेंटेटिव्ह (USTR) ने 2019 मध्ये प्रसिद्ध केलेल्या व्यापार अडथळ्यांच्या अहवालात म्हटले आहे की जीडीपीआर कायदा आणि त्याच्या अंमलबजावणीमुळे युरोपियन युनियन बाहेरील देशांना युरोपसोबत व्यवसाय करण्यासाठी महत्त्वपूर्ण अडथळे निर्माण झाले आहेत.

भारतीय निर्यातदारांवर काय परिणाम होतो?

जीडीपीआरमुळे कंपन्यांवर अनेक आर्थिक परिणाम होतात. हे समजून घेतल्यावरच या कायद्यांचे पालन केल्याने भारतीय निर्यातदारांच्या व्यावसायिक संभावनांवर काय परिणाम होईल हे कळेल.

खर्चात वाढ

या नियमांचे पालन करण्यासाठी व्यापाऱ्यांना ठराविक रक्कम वाटप करावी लागेल. अशा परिस्थितीत, खर्च वाढण्याची अनेक कारणे आहेत. युरोपियन युनियनमध्ये व्यवसाय करण्याचा मार्ग बदलणे.

1. डेटा संरक्षण नियमांचे पालन करण्यासाठी अधिक संसाधनांची आवश्यकता असेल. कामाची पद्धत बदलावी लागेल. लेखापरीक्षणाची नवी पद्धत अवलंबावी लागेल.

2. जीडीपीआर अनुरूप तंत्रज्ञानाचा अवलंब करावा लागेल. जीडीपीआर अनुपालन तंत्रज्ञान तयार करण्यासाठी कंपन्यांना पैसे खर्च करावे लागतील किंवा असे तंत्रज्ञान खरेदी करावे लागेल.

3. कर्मचाऱ्यांवरील खर्च वाढेल: जीडीपीआर नियमांनुसार डेटा प्रोटेक्शन ऑफिसरची नियुक्ती अनिवार्य आहे. कंपन्या कायदेशीर सल्लागार कंपन्यांचीही मदत घेऊ शकतात. यामुळे कंपन्यांच्या खर्चात लक्षणीय वाढ होते. काही कंपन्या जीडीपीआर नियमांचे पालन करण्यासाठी दरवर्षी 10 दशलक्ष युरोपेक्षा जास्त खर्च करतात. युरोपियन युनियनमध्ये व्यवसाय करू इच्छिणाऱ्या भारतीय कंपन्यांना निर्यात सुरू होण्यापूर्वीच मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च करावा लागू शकतो.

व्यवसाय करण्यासाठी जास्त खर्च:

जीडीपीआर मुळे, कंपन्यांना वैयक्तिक डेटा गोळा करणे आणि त्यातून त्यांच्या कामासाठी डेटा काढणे कठीण होईल. अधिक पैसा आणि इतर संसाधने देखील खर्च करावी लागतील. त्यामुळे कंपन्यांची उत्पादकता कमी होईल.

महसूल आणि नफ्यात घट

जीडीपीआरमुळे वस्तूंच्या किमतीत वाढ झाल्याने विक्रीत घट होते. यामुळे विक्री 2.2 टक्क्यांनी आणि नफा 4 टक्क्यांनी घटल्याचे आढळून आले आहे. नफा कमी झाल्यास भारतीय निर्यातदार युरोपीय संघाच्या बाजारपेठेत जाण्यापासून परावृत्त होतील.

कंपनीला अधिक पैसा आणि इतर संसाधने देखील खर्च करावी लागतील. त्यामुळे कंपन्यांची उत्पादकता कमी होईल.

कमी स्पर्धा

भारतीय व्यावसायिकांच्या वस्तूंची युरोपियन युनियनमध्ये कमी विक्री केली जाते, तर जीडीपीआरचे पालन करण्याची किंमत खूप महाग आहे. ज्या कंपन्यांच्या विक्रीत युरोपियन युनियनचा वाटा जास्त आहे अशा कंपन्यांशी याची तुलना केली, तर असे लक्षात येते की या नियमामुळे त्या देशांतील कंपन्या, जे EU शी संबंधित आहेत, त्यांना स्पर्धेच्या पातळीवर धार मिळते. या बाबतीत स्वित्झर्लंडचे उदाहरण घेता येईल.

लहान कंपन्यांवर अधिक नकारात्मक परिणाम

जीडीपीआरमुळे मोठ्या कंपन्या कमी प्रभावित होतात, तर 500 किंवा त्यापेक्षा कमी कर्मचारी असलेल्या छोट्या कंपन्या जास्त प्रभावित होतात. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात छोट्या कंपन्यांचे नुकसान होते. मोठ्या कंपन्यांचा बाजारातील हिस्सा वाढतो. भारतीय कंपन्या साधारणपणे युरोपियन कंपन्यांच्या तुलनेत लहान असतात, त्यामुळे त्यांना जास्त तोटा सहन करावा लागतो. भारतातील 92 टक्के कंपन्या अशा आहेत ज्यात कर्मचाऱ्यांची संख्या 100 किंवा त्याहून कमी आहे. त्यामुळे त्यांना आणखी अडचणींचा सामना करावा लागत आहे.

भारत काय करू शकतो?

संस्थात्मक कमतरता दूर करा

ऑगस्ट 2020 मध्ये, जीडीपीआरच्या मुद्द्यावर अमेरिका आणि युरोपियन युनियनमध्ये चर्चा झाली त्यानंतर दोघांमध्ये करार झाला. US-EU डेटा गोपनीयता फ्रेमवर्क तयार केले. 2023 मध्ये, युरोपियन कमिशनने निर्णय दिला की अमेरिकेचे डेटा गोपनीयता कायदे देखील जीडीपीआर सारखेच आहेत. यानंतर जीडीपीआरमुळे अमेरिकन कंपन्यांच्या मार्गात जे अडथळे येत होते ते दूर झाले.

भारतीय कंपन्या साधारणपणे युरोपियन कंपन्यांच्या तुलनेत लहान असतात, त्यामुळे त्यांना जास्त तोटा सहन करावा लागतो.

युरोपियन युनियनसोबत मुक्त व्यापार कराराची (FTA) वाटाघाटी करणाऱ्या भारतीय वार्ताकारांनी चर्चेत हा मुद्दाही समाविष्ट केला पाहिजे. जीडीपीआरबाबत युरोपियन युनियनला ज्या काही चिंता आहेत, त्या डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायद्यामध्ये समाविष्ट केल्या पाहिजेत.

जीडीपीआरचे पालन केल्यामुळे होणाऱ्या अनेक खर्चात वाढ होण्याचा अंदाज आहे. हा खर्च कमी करण्यासाठी सरकार मदत करू शकते. तंत्रज्ञान क्षेत्रातील भारतीय कंपन्यांनी जीडीपीआरचे पालन करणारी साधने विकसित केली पाहिजेत. यासाठी शासनाने अनुदान द्यावे. जीडीपीआरचे पालन करणारी साधने विकसित करण्याचा एक फायदा असा होईल की त्यांना मोठी बाजारपेठ मिळेल. मध्यम आणि लघु उद्योगांमध्ये गुंतलेल्या भारतीय कंपन्या आणि व्यापारी जे पहिल्यांदा निर्यात करत आहेत त्यांनाही सबसिडी देण्यात यावी जेणेकरून ते जीडीपीआर नुसार त्यांची उत्पादने बनवू शकतील. करात सूट आणि पेमेंट सुविधा देणाऱ्या भारतीय मशीन्ससोबतच या कंपन्यांना जीडीपीआरचे पालन करण्याची सुविधाही मोफत दिली तर त्याचे दीर्घकालीन परिणाम अधिक चांगले होतील.

तंत्रज्ञान क्षेत्रातील भारतीय कंपन्यांनी जीडीपीआरचे पालन करणारी साधने विकसित केली पाहिजेत. यासाठी शासनाने अनुदान द्यावे.

यासोबतच ज्या व्यापाऱ्यांना युरोपियन युनियनसोबत व्यवसाय करायचा आहे त्यांना जीडीपीआरची माहिती द्यावी. या कामात उद्योग संस्थांची मदत घेता येईल. हे या कंपन्यांना स्वतः जीडीपीआरचे पालन करण्यास प्रवृत्त करेल. अशी साधने विविध भारतीय भाषांमध्ये बनवली जावीत ज्याच्या मदतीने या कंपन्या स्वत: त्यांची उत्पादने EU मानकांनुसार प्रमाणित करू शकतील. युरोपियन युनियन सोबत व्यवसाय करण्याची सर्वाधिक शक्यता असलेल्या क्षेत्रातील कंपन्यांनी जीडीपीआरचे पालन करणाऱ्या कार्यक्रमांमध्ये गुंतले पाहिजे. त्यामुळे या कंपन्यांच्या मार्गात येणारे अडथळे कमी होतील.

जीडीपीआरचा फायदा कसा मिळवायचा?

जीडीपीआरने भारतासाठीही संधी निर्माण केली आहे. याचा उपयोग भारत आपल्या फायद्यासाठी करू शकतो. जीडीपीआरचे पालन करण्यासाठी भारतीय कंपन्यांमध्ये युरोपियन तज्ञांना सहभागी करून घेणे महागडे आहे. अशा परिस्थितीत, जीडीपीआरचे आव्हान हाताळण्यास सक्षम असलेल्या स्थानिक प्रतिभावंतांना प्रोत्साहन दिले पाहिजे. यासाठी व्यवस्थापन, कायदा आणि तंत्रज्ञानाशी संबंधित महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमांमध्ये जीडीपीआरशी संबंधित विषयांचा समावेश करण्यात यावा. तंत्रज्ञान क्षेत्रातील बहुतेक भारतीय कंपन्यांची कार्यालये बेंगळुरू, दिल्ली आणि पुणे सारख्या शहरांमध्ये आहेत. या कंपन्यांनी शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याने अशा सल्लागार कंपन्या उघडल्या पाहिजेत ज्या जीडीपीआर क्षेत्रात काम करतील आणि युरोपियन ग्राहकांनुसार धोरणे तयार करतील. याचा एक फायदा असा होईल की भारत मानव संसाधनांची निर्यातही करू शकेल. युरोपियन युनियनमध्ये डेटा संरक्षण अधिकाऱ्यांची मागणी वाढत आहे. अशा परिस्थितीत जीडीआरपी क्षेत्रात प्रशिक्षण घेतलेल्या भारतीय तरुणांना युरोपमध्ये काम मिळू शकेल.

अशा परिस्थितीत, जीडीपीआरचे आव्हान हाताळण्यास सक्षम असलेल्या स्थानिक प्रतिभावंतांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

निष्कर्ष

जीडीपीआर नियमांचे पालन करणे हे भारतीय व्यावसायिकांसाठी मोठे आव्हान आहे. यामुळे खर्च वाढतो आणि उत्पादने महाग होतात. जीडीपीआर नियमांचे पालन न केल्याबद्दल लादण्यात आलेला मोठा दंड भारतीय कंपन्यांना युरोपियन बाजारपेठेत प्रवेश करण्यास परावृत्त करतो. अशा परिस्थितीत सरकारने या कंपन्यांना जीडीपीआरचे पालन करण्यास मदत केली तर भारतीय निर्यातीत लक्षणीय वाढ होईल.

# एक सेवाभावी व्यक्तित्व

काही नाती वेगळीच असतात शब्दां पलीकडची!त्या नात्यांना काहीच नाव नसते, ना ती आपल्या रक्ताची असतात, तरीही ती खूप जवळची असतात!

माझी मुलगी साईशाने यूएस ला जाण्याचे ठरवले.आम्हाला तिकडच्या अभ्यासक्रमाबद्दल काहीच कल्पना नव्हती. खरंतर तिच्या आत्या ,आत्याची मुले अमेरिकेत असूनही मी अनभिज्ञच होते.श्री श्रीकांत राऊत यांनी मला त्यांची भाची स्नेहाचा नंबर दिला.स्नेहा अमेरिकेत राहत होती.स्नेहाने मला तिचे कौन्सिलर श्री हिरेन राठोड सरांचा नंबर दिला.साईशा आणि तिचे बाबा रोज या नंबर वर फोन करत पण फोन घेतला जात नसे.

सरते शेवटी मी फोन केला आणि एका छानशा भारदस्त आवाजाने मला प्रतिसाद दिला," बोला मीच हिरेन राठोड" त्यांनी त्यांच्या ऑफिसचा पत्ता देऊन तिथे बोलावले. मी काही त्यांना भेटायला जाऊ शकले नाही पण त्यांच्या मार्गदर्शनाखाली साईशा कॅलिफोर्नियाला गेली.जागा नवीन, अभ्यास नवीन, वातावरण वेगळं आणि एक दिवस तिने मला फोन केला

" मम्मा मला हा कोर्स बदलायचा आहे, मी नाही करू शकणार हा कोर्स"

माझ्या पायाखालची जमीनच सरकली. अतिशय विचारी शांत स्वभावाच्या साईशाने मला अंतिम निर्णय तर सांगितलाच पण कधीही न रडणारी, खचणारी मुलगी रडू लागली.माझा तर धीरच खचला." नाहीतर मी सर्व सोडून परत येते" असं ती म्हणाली.मला तर चहुकडे अंधारच अंधार दिसू लागला.काय करावे ते सुचेना.भरपूर खर्च झाला होता.पैसेही फुकट जाणार होते.

आता माझ्यासमोर एकच नाव होतं श्री. हिरेन राठोड सर!

मी कोणालाही न सांगता हिरेन सरांना मेसेज केला पण सरांनी तो पाहिलाच नाही मी फोन केला तर लगेच मेसेज आला,"i will call you mam"

मला तर धीरच नव्हता मी त्यांना सर्व परिस्थिती मेसेज करून सांगितली.आणि त्यांनी मला समोरून फोन केला.माझी समजूत घातली." साईशाला मला फोन करायला सांगा" असं ते म्हणाले.त्यांच्या बोलण्याने मला प्रचंड धीर आला.ते एक एक गोष्ट नीट समजावून सांगत होते.मी जवळ जवळ वीस ते पंचवीस मिनिटे त्यांच्याशी बोलत होते.एका न पाहिलेल्या अनोळखी व्यक्तीस मी अनुभवत होते.त्यांच्या शब्दा शब्दात जादू होती त्यांनी मला आणि साईशाला भरपूर वेळ दिला.ती अजूनही तयार नव्हती आणि तेव्हाच हिरेन सर मला बोलले," मी हॉस्पिटलला आहे माझी सर्जरी झाली आहे"



माझ्या डोळ्यात क्षणभर पाणी तरळले.... ना नातं ना ओळख काही नाही साईशाच्या ॲडमिशनमुळे तिचा आणि तिच्या बाबांचा तेवढा संबंध आलेला तरीही हिरेन सर तेथूनही माझ्याशी बोलत होते. मी मात्र निशब्द झाले. स्वतःचे ऑपरेशन झालेले असतानाही त्यांनी आमच्यासाठी दिलेला वेळ खरोखरच बहुमोल होता." तुम्ही काळजी घ्या सर मी बोलते तिच्याशी" मलाच गिल्टी वाटत होतं.मी असं म्हटल्यावर ते म्हणाले," माझी गरज लागली तर नक्की फोन करा मॅडम" मला काहीच शब्द सुचत नव्हते.मी कसंतरी थँक्यू म्हणून फोन ठेवला.

हे सर्व काही ते पैशासाठी करत नव्हते तर हे सारे लाभेविन प्रेम होते.आम्ही त्यांना काहीही देणार नव्हतो पण एका आईची तडफड समजणारे हिरेन सर माझ्यासाठी निव्वळ एक 'अवलीया' होते, देव आणखी कसा वेगळा असतो!मी त्यांना कधीच भेटले नव्हते पण पलीकडच्या व्यक्तीची स्पंदने मला समजतात.त्यानंतरही जेव्हा जेव्हा कोणत्याही मदतीसाठी मी सरांना मेसेज केला हिरेन सर लगेचच रिप्लाय करत राहिले.काय असतं नातं म्हणजे तरी?माणूस म्हणून जन्माला आलो तर माणुसकी कशी जपावी कसं जगावं मानवतेच्या नात्याने हे मी त्यांच्याकडून शिकले.अत्यंत शुद्ध मराठीत ते कळकळीने आणि तळमळीने बोलतात.आपल्या विद्यार्थ्यांबद्दलची त्यांची तळमळ ओढ जाणवतेच पण मुलांच्या पालकांना त्यांनी दिलेली खंबीर साथ नक्की कशाच द्योतक होतं ?एका निरलस प्रेमाचं!

त्यानंतर त्यांच्या स्वभावाबद्दल त्यांच्या सर्वांसोबतच्या प्रेमळ वागणुकीबद्दल साईशाने मला माहिती दिली.त्यांच्या प्रेमळ समजावणीमुळे साईशाने कोर्स सुरूच ठेवला आणि आता पूर्णही होत आला आहे.

मला व्हिसासाठी अप्लाय करायचं होतं.मी हिरेन सरांना अगदी हक्काने मेसेज केला.अर्थात प्रतिसाद सकारात्मकच.त्यांनी लगेचच त्यांच्या ऑफिसमध्ये मला येण्यासाठी सांगितलं.

माणसाकडे सारं काही असतं तरी त्याच्यात मूळ गुणधर्म मानवता असेलच असे नाही.उलट पैसा, कीर्ती आल्यावर माणूस माणुसकी विसरतो, अहंकारी बनतो.हिरेन सरांनी या लहान वयात सर्व काही मिळवले कीर्ती, नाव, पैसा!इम्पिरियलच नाव खूप मोठ आहे ,खूप ठिकाणी त्याच्या शाखाही आहेत पण हिरेन सरांचे पाय घट्ट जमिनीशी जुळलेले आहेत.माणसाच्या मनापर्यंत त्यांच्या खोल अंतरंगापर्यंत ते पोहोचू शकतात. अनेक विद्यार्थ्यांना जीवनाच्या नव्या वाटा दाखवणाऱ्या ह्या किमयागार व्यक्तीस देव आरोग्य संपन्न जीवन प्रदान करो आणि त्यांच्या कुटुंबीयांसमवेत त्यांना दीर्घायु लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!!

- डॉ. सुचिता पाटील

# मोदींना मिळाला भूतानचा सर्वोच्च नागरिक सन्मान

## पुरस्कार भारताच्या 140 कोटी नागरिकांना समर्पित - पंतप्रधान

वृत्तसंस्था
थिम्फू

पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या भूतान दौऱ्यावर आहेत. दरम्यान, शुक्रवारी भूतानचे राजे जिग्मे वांगचुक यांनी पंतप्रधानांना सर्वोच्च 'ऑर्डर ऑफ ड्रुक ग्याल्पो' पुरस्काराने सन्मानित केले. हा सन्मान 140 कोटी भारतीयांना समर्पित करत असल्याचे मोदी म्हणाले.

मोदी म्हणाले, "एक भारतीय म्हणून माझ्या आयुष्यातील आजचा दिवस खूप मोठा आहे, तुम्ही मला भूतानचा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. प्रत्येक पुरस्कार स्वतःमध्ये खास असतो पण जेव्हा मला दुसऱ्या देशाकडून पुरस्कार मिळतो



***निवडणुका जाहीर झाल्यानंतर परदेश दौऱ्यावर जाणारे पहिले पंतप्रधान***

*भारतात सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्यानंतर परदेश दौऱ्यावर जाणारे मोदी हे पहिले पंतप्रधान आहेत. तज्ज्ञांच्या मते, निवडणुकीपूर्वी भूतानला भेट देऊन मोदींनी शेजारील देशाला त्याचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे.*

तेव्हा ते विशेष असते." असे वाटते की आपले दोन्ही देश योग्य दिशेने वाटचाल करत आहेत."

याआधी ते राजधानी थिम्पू येथील ताशिचो जोंग पॅलेसमध्ये पोहोचले. येथे त्यांचे औपचारिक स्वागत करण्यात आले. त्यांनी भूतानचे राजा जिग्मे वांगचुक यांची भेट घेतली. भूतानमध्ये पोहोचल्यानंतर पंतप्रधान शेरिंग तोबगे यांनी पारो विमानतळावर मोदींचे गळभेट घेऊन स्वागत केले. तोबगे यांनी मोदींना सांगितले, 'स्वागत आहे, माझ्या मोठ्या भावाचे.' त्यांना गार्ड ऑफ ऑनरही देण्यात आला.

भारत आणि भूतान यांचा समान वारसा आहे. भारत ही भगवान बुद्धांची भूमी आहे, त्यांचे तपश्चर्येचे निवासस्थान आहे. भारत ही भूमी आहे जिथे बुद्धांना ज्ञान प्राप्त झाले. भूतानने भगवान बुद्धांच्या शिकवणी आत्मसात केल्या आणि त्यांचे जतन केले.

भारत आणि भूतानमधील भागीदारी केवळ जमीन आणि पाण्यापुरती मर्यादित नाही. भूतान आता भारताच्या अंतराळ मोहिमेत भागीदार आहे. भूतानच्या शास्त्रज्ञांनी इस्रोच्या सहकार्याने उपग्रह प्रक्षेपित केला आहे. आम्ही एकमेकांचे यश साजरे करतो.

# देशातील सर्वात मोठ्या निर्माणाधीन पुलाचा अपघात



## पुलाचे गर्डर कोसळून एकाचा मृत्यू

वृत्तसंस्था
पाटणा

बिहारमधील सुपौल इथं कोसी नदीवर बांधण्यात येणारा देशातली सर्वात मोठा निर्माणाधीन पुलाचा काही भाग कोसळला. या पुलाच्या ढिगाऱ्याखाली दबून एका नागरिकाचा मृत्यू झाला आहे. मात्र ढिगाऱ्याखाली अद्याप अनेक नागरिका दबल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

बिहारमध्ये कोसी नदीवर बांधण्यात येत असलेल्या देशातील सर्वात मोठा बाकौर पुलाचा काही भाग कोसळल्यानं मोठी खळबळ उडाली. या पुलाच्या तीन खांबाचे गर्डर पडल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या घटनेत अनेक नागरिक जखमी झाल्याचं सांगण्यात येत आहे. तब्बल 1200 कोटी रुपये खर्चून बांधकाम सुरु होतं. हा पूल कोसळल्यानं या घटनेत एका नागरिकाचा मृत्यू झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

"बकौर पुलाच्या बांधकामाचा दर्जा खराब आहे. आम्ही पुलाच्या निकृष्ट बांधकामाबद्दल तक्रार करत होतो. मात्र आमच्यावर खंडणी मागितल्याचा आरोप केला गेला. पुलाच्या बांधकामाबाबत कोणी आवाज उठवला तर पोलिसांना पाठवलं जायचं. त्यामुळे कोणीच बोलत नव्हतं. या पुलाच्या ढिगाऱ्याखाली 30-40 नागरिकांचा मृत्यू झाल्याची शक्यता आहे. परंतु एकही अधिकारी इथं पोहोचली नाही. आम्ही 15-20 जणांना दुचाकीवरून रुग्णालयात नेलं आहे." - सुरेंद्र प्रसाद यादव, स्थानिक

कोसी नदीवर बांधण्यात येणाऱ्या बाकौर पुलाचे तीन गर्डर क्रेनमधून घसरल्यानं ते खाली पडले. या अपघातात अनेक मजूर पुलाच्या गर्डरखाली दबल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. कोसी नदीवरील भारत माला प्रकल्पांतर्गत या बकौर पुलाचं बांधकाम सुरु आहे. घटनेच्या वेळी 153 आणि 154 क्रमांकाच्या पिलरमधील गर्डर क्रेनमधून निसटून खाली कोसळला. या घटनेत पुलावर काम करणारे बंगालमधील अनेक मजूर गाडले गेले आहेत. मात्र या घटनेत आता किती मजूर गाढले गेले,याची पुष्टी अद्यापही प्रशासनाकडून करण्यात आली नाही.

# यूपी मदरसा बोर्ड कायदा असंवैधानिक म्हणून घोषित

वृत्तसंस्था
लखनौ

अलाहाबाद हायकोर्टाच्या लखनऊ खंडपीठाने यूपी बोर्ड ऑफ मदरसा शिक्षण कायदा 2004 असंवैधानिक घोषित केला आहे. हे धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचे उल्लंघन असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

यासोबतच मदरशांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना औपचारिक शिक्षण व्यवस्थेत समाविष्ट करता यावे यासाठी यूपी सरकारला एक योजना तयार करण्यास सांगितले आहे. अंशुमन सिंह राठोड यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती विवेक चौधरी आणि न्यायमूर्ती सुभाष विद्यार्थी यांच्या खंडपीठाने शुक्रवारी हा निर्णय दिला. 10 सप्टेंबर 2022 ते 15 नोव्हेंबर 2022 या कालावधीत मदरशांचे सर्वेक्षण करण्यात आले. ही मुदत नंतर 30 नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आली. या सर्वेक्षणात राज्यातील सुमारे 8441 मदरसे मान्यताप्राप्त नसलेले आढळले. मुरादाबादमध्ये सर्वाधिक 550 मदरसे, बस्तीमध्ये 350 आणि मुझफ्फरनगरमध्ये 240 मदरसे मान्यता नसलेले आढळले. राजधानी लखनऊमध्ये 100 मदरशांना मान्यता नाही. याशिवाय प्रयागराज-मऊमधील 90 मदरसे, आझमगडमधील 132 आणि कानपूरमधील 85 हून अधिक मदरसे अपरिचित आढळले.

सरकारच्या म्हणण्यानुसार, सध्या राज्यात 15 हजार 613 मान्यताप्राप्त मदरसे आहेत. ऑक्टोबर 2023 मध्ये यूपी सरकारने मदरशांची चौकशी करण्यासाठी एसआयटी स्थापन केली होती. मदरशांना दिल्या जाणाऱ्या परकीय निधीची एसआयटी चौकशी करत आहे.

## तालिबानने डोळे वटारुन पाहताच पाकिस्तानची तंतरली...

# म्हणाले,आम्हाला युद्ध नकोय

वृत्तसंस्था
इस्लामाबाद

पाकिस्तान आणि तालिबानमध्ये मागील काही दिवसांपासून युद्धसदृश परिस्थिती आहे. आधी दहशतवादी हल्ल्याचा आरोप करत पाकिस्तानी लष्कराने अफगाणिस्तानात घुसून हवाई हल्ला केला, ज्यामध्ये तीन मुलांसह आठ जणांना जीव गमवावा लागला. पाक-अफगाण सीमेवर तालिबानने पाकिस्तानी लष्करावर गोळीबार केल्याची माहिती मिळाली आहे. यातच आता, गुरुवारी पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांचे मोठे वक्तव्य समोर आले आहे. ख्वाजा आसिफ म्हणाले की, इस्लामाबादला काबूलसोबत युद्ध नको आहे. पाकिस्तान सरकारचे हे वक्तव्य तालिबानच्या धमकीनंतर आले आहे, ज्यामध्ये तालिबानने गंभीर परिणाम भोगावे लागतील असा इशारा दिला होता.

इस्लामाबादला काबूलसोबत कोणत्याही प्रकारचे युद्ध नको आहे, असे पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी गुरुवारी सांगितले. "आम्हाला अफगाणिस्तानशी युद्ध नको आहे आणि बळाचा वापर हा शेवटचा उपाय आहे," असे असिफ यांनी व्हॉइस ऑफ अमेरिकाला सांगितले. तेहरीक-ए-तालिबान पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील इतर प्रतिबंधित संघटनांकडून पाकिस्तानमध्ये वाढत्या दहशतवादी हल्ल्यांमुळे दोन्ही शेजारी देशांमधील तणाव लक्षणीयरीत्या वाढला असताना संरक्षणमंत्र्यांचे हे वक्तव्य आले आहे.

यापूर्वी, सोमवारी पाकिस्तानने गुप्तचर माहितीच्या आधारे अफगाणिस्तानमध्ये कारवाई केली होती. टीटीपीच्या हाफिज गुल बहादूर गटाला लक्ष्य करण्यात आले. पाकिस्तानी लष्कराचा आरोप आहे की, उत्तर वझिरीस्तानमध्ये 16 मार्च रोजी झालेला हल्ला आणि इतर अनेक दहशतवादी हल्ल्यांसाठी टीटीपी जबाबदार आहे. पाकिस्तानी लष्करावर झालेल्या प्राणघातक हल्ल्यानंतर इस्लामाबादने ही कारवाई केली. या दहशतवादी हल्ल्यात लेफ्टनंट कर्नल आणि कॅप्टनसह सात पाकिस्तानी सैनिक मारले गेले. अफगाणिस्तानमधील पाकिस्तानच्या लष्करी कारवाईला वाढत्या सीमापार दहशतवादाच्या विरोधात एक महत्त्वाचा संदेश म्हणून वर्णन करुन, आसिफ यांनी तालिबान सरकारला टीटीपीवर नियंत्रण ठेवण्याचे आणि पाकिस्तानविरुद्ध युद्ध सुरू करु न देण्याचे आवाहन केले आहे. "आम्ही हे चालू ठेवू देऊ शकत नाही आणि जर टीटीपीने पाकिस्तानवर हल्ले सुरुच ठेवले तर इस्लामाबादला प्रत्युत्तर देण्यास तयार आहे," असेही ते पुढे म्हणाले.

# के. कविता यांच्या अटकेविरोधातील याचिका फेटाळली

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या कन्या आणि आमदार के. कविता यांच्या अटकेविरोधातील याचिका सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी (22 मार्च) फेटाळली. सुप्रीम कोर्टाने म्हटले- कविता यांना जामिनासाठी आधी ट्रायल कोर्टात याचिका दाखल करावी लागेल.

